सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. ३० मार्च २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३५० | पाने : ८ | किंमत रु. ६/–

dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# जगभरात पेट्रोल–डिझेलचे संकट घोंगावतंय

## 'मन की बात'मधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला इशारा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** जगभरातील सुरू असलेल्या संघर्षामुळे ऊर्जा क्षेत्रावर परिणाम होत असून, यामुळे पेट्रोल आणि डिझेलचे मोठे संकट निर्माण होत असल्याचा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी (दि. २९) 'मन की बात'च्या माध्यमातून दिला.

'मन की बात'च्या १३२ व्या भागात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, मार्च महिना जागतिक स्तरावर अत्यंत घडामोडींचा राहिला आहे. गेल्या काळात कोरोनामुळे संपूर्ण जगाला प्रदीर्घ काळ अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. कोरोनाच्या संकटातून बाहेर पडल्यानंतर जग एका नव्या सुरुवातीसह प्रगतीच्या पथावर पुढे जाईल, अशी आपल्या सर्वांची अपेक्षा होती; परंतु जगाच्या विविध भागांत युद्ध आणि संघर्षाची परिस्थिती निर्माण होत राहिली.

सध्या आपल्या शेजारील क्षेत्रात गेल्या महिनाभरापासून भीषण युद्ध सुरू आहे. या देशांमध्ये, विशेषतः आखाती देशांमध्ये लाखो भारतीय कुटुंबांचे नातेवाईक वास्तव्यास आहेत आणि तिथे काम करत आहेत. तिथे असलेल्या १ कोटींहून अधिक भारतीयांना सर्व प्रकारची मदत पुरवल्याबद्दल मी आखाती देशांचा अत्यंत ऋणी आहे. ज्या भागात हे युद्ध सुरू आहे, ते आपल्या ऊर्जा गरजांचे मुख्य केंद्र आहे. यामुळेच आता जगभरात पेट्रोल आणि डिझेलचे संकट निर्माण



होत आहे.या आव्हानांनंतरही भारताची स्थिती मजबूत असल्याचे सांगत पंतप्रधान म्हणाले की, जागतिक संबंध, विविध देशांचे सहकार्य आणि गेल्या दशकात देशाने निर्माण केलेली क्षमता यामुळे भारत या आव्हानांचा खंबीरपणे सामना करत आहे.

देशातील जनतेला एकजुटीचे आवाहन करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, हा काळ निश्र्चितच आव्हानात्मक आहे. मी देशवासीयांना पुन्हा एकदा विनंती करतो की, आपण सर्वांनी एकत्र येऊन या आव्हानावर मात करावी. १४० कोटी जनतेच्या सामूहिक शक्तीच्या जोरावर आपण या कठीण परिस्थितीतून नक्कीच यशस्वीपणे बाहेर पडू. या विषयावर कोणीही राजकारण करू नये. हा १४० कोटी नागरिकांच्या हिताचा प्रश्न आहे. यात स्वार्थाच्या राजकारणाला स्थान नाही. जे अफवा पसरवत आहेत, ते देशाचे नुकसान करत आहेत. अफवांना बळी न पडता सरकारने दिलेल्या अधिकृत माहितीवरच विश्र्वास ठेवा, असे आवाहनही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना केले आहे.

पंतप्रधानांनी हस्तलिखितांची माहिती गोळा करण्यासाठी 'ज्ञान भारतम सर्वेक्षणा'बद्दल माहिती दिली. नागरिक 'ज्ञान भारतम' पद्वारे आपल्याकडे असलेल्या प्राचीन हस्तलिखितांची माहिती किंवा फोटो शेअर करून या मोहिमेत सहभागी होऊ शकतात. ढ भारतीय क्रिकेट संघाने ढ२० विश्र्वचषकात मिळवलेल्या ऐतिहासिक विजयाचे पंतप्रधानांनी कौतुक केले. गुलमर्ग आता क्रीडा स्पर्धांचे केंद्र बनत असून 'खेलो इंडिया विंटर गेम्स'मुळे या भागाला नवी ओळख मिळाली आहे. तेथील तरुणांमध्ये फुटबॉलचीही क्रेझ वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले.

आंतरराष्ट्रीय योग दिनाला आता १०० पेक्षा कमी दिवस उरले आहेत, याची आठवण करून देत पंतप्रधानांनी आरोग्यावर लक्ष देण्याचे आवाहन केले. साखरेचे सेवन कमी करा आणि स्वयंपाकाच्या तेलाचा वापर १० टक्क्यांनी कमी करा. हे छोटे प्रयत्न तुम्हाला लठ्ठपणा आणि जीवनशैलीशी संबंधित आजारांपासून दूर ठेवतील, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

## अटल सागरी सेतूवरून २६ महिन्यांत दोन कोटी वाहनांचा प्रवास!

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २९ मार्च :** मुंबईला वेगाने विकसित होत असलेल्या तिसऱ्या मुंबईशी जोडणाऱ्या अटल सागरी सेतूवरून २६ महिन्यांत २ कोटी वाहनांनी प्रवास केला आहे. यामुळे भारतातील सर्वात लांब सागरी सेतू असलेल्या अटल सेतूनं एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. ही माहिती एमएमआरडीए प्रशासनाने दिली.

नवा उच्चांक गाठणाऱ्या अटल सेतूचे १३ जानेवारी २०२४ रोजी उद्घाटन झाले. उद्घाटन झाल्यापासून, या पुलावर २ कोटींहून अधिक वाहनांच्या प्रवासाची नोंद झाली आहे. वाहनांच्या नोंदणीनुसार २७ मार्च २०२६ रोजी २,००,००,३१६ व्या वाहनाने अटल सेतूवरून प्रवास केला आहे. हा क्षण मुंबई महानगर क्षेत्रातील प्रत्येक प्रवासी, प्रत्येक कुटुंबासाठी विशेष आहे. या माध्यमातून नवीन जीवनवाहिनीनं क्रांती घडवून आणली आहे, असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही, असे एमएमआरडीए प्रशासनाने सांगितले.

दुर्गम भाग ते मुख्य शहर, अवघ्या काही मिनिटांत : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झालेला अटल सेतू दक्षिण मुंबईतील शिवडीला नवी मुंबईतील चिरले या गावाशी जोडतो, ज्यामुळे प्रवासाचा वेळ तासाभरावरून अवघ्या २० मिनिटांवर आला आहे. केवळ दोन वर्षांत या सेतूनं फक्त दळणवळणाची परिभाषा बदलली नाही, तर अर्थव्यवस्थेलाही गती दिली आहे. व्यापार वाढवणं, इंधनाचा खर्च कमी करणं, प्रवास सुलभ करणं आणि जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांचे नवे मानक प्रस्थापित करणं हे या पुलानं साध्य केलं आहे.

## थोडक्यात...

### विवोचा नवा स्मार्टफोन २ एप्रिलला होणार लाँच

मुंबई :विवो कंपनीनं आपल्या व्ही७० सिरीज अंतर्गत व्ही७० एफई हा नवीन स्मार्टफोन भारतात लाँच करण्याची अधिकृत घोषणा केली असून हा फोन २ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १२ वाजता सादर केला जाणार आहे. मिड–रेंज सेगमेंटमध्ये येणाऱ्या या फोनमध्ये दमदार कॅमेरा, मोठी बॅटरी आणि आधुनिक फीचर्स दिल्यामुळे सर्वसामान्य वापरकर्त्यांसाठी हा एक आकर्षक पर्याय ठरण्याची शक्यता आहे. कंपनीनं आधीच या फोनसाठी टीझर आणि मायक्रोसाइट सुरू केली असून, फोनचा फोकस ऑल–डे परफॉर्मन्स आणि यूजर–फ्रेंडली डिझाइनवर असल्याचं स्पष्ट केलं आहे. व्ही७० एफई हा स्मार्टफोन भारतात ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर उपलब्ध होणार असून अमेझॉन आणि फ्लिपकार्ट यांसारख्या ई–कॉमर्स साइट्सवर त्याची विक्री होईल.

### इराणने पाडले लढाऊ विमान

नवी दिल्ली:मध्य पूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्र्वभूमीवर, इराणने अमेरिकेचे लष्करी तळ आणि त्यांची एफ–१६ लढाऊ विमाने लक्ष्य केल्याचा मोठा दावा केला आहे. इराणच्या निमलष्करी इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सचा हवाला देत, स्थानिक माध्यमांनी वृत्त दिले आहे की, त्यांनी एक एफ–१६ लढाऊ विमान आणि एक अमेरिकन एमक्यू–९ ड्रोन पाडले आहे. मात्र, अमेरिकेने याबाबत कोणतेही निवेदन जारी केलेले नाही.इराणच्या तसनीम वृत्तसंस्थेच्या म्हणण्यानुसार इराणी नागरिक आणि औद्योगिक स्थळांवर झालेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून ही कारवाई करण्यात आली. आयआरजीसीचा दावा आहे की, त्यांनी 'व्याप्त प्रदेशां'मधील अमेरिकी–इस्रायली तळांना लक्ष्य केले.

## थारने तिघांना चिरडले

नवी दिल्ली:गुरुग्राममध्ये एक मोठा अपघात झाला आहे. भरधाव वेगाने येणाऱ्या थार कारने तिघांना चिरडले. तिघांचाही जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये एक पुरुष, एक १० वर्षाचा मुलाचा आणि एक ८ वर्षाचा मुलगा आहे. या घटनेचा सीसीटीव्ही फुटेज समोर आला आहे. गुरुग्राममध्ये भरधाव वेगाने जाणाऱ्या थार कारने तीन जणांना चिरडले आहे. या घटनेत तिघांचाही मृत्यू झाला आहे. ही घटना पटौदीच्या खोड गावात घडली. थार गाडीचा चालक, तिघांना धडक दिल्यानंतर गाडी सोडून घटनास्थळावरून फरार झाला.






# विजयपत सिंघानियांचे मुंबईत निधन

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २९ मार्च :** रेमंड समुहाचे माजी अध्यक्ष विजयपत सिंघानिया यांचे मुंबईत निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. विजयपत सिंघानिया यांचे पुत्र उद्योगपती गौतम सिंघानिया यांनी ही माहिती दिली. मुंबईच्या चंदनवाडी स्मशानभूमीत रविवारी दुपारी विजयपत सिंघानिया यांच्यावर अंत्यसंस्कार होणार आहेत.



विजयपत सिंघानिया हे एक दूरदृष्टी असलेले उद्योगपती, नेता, समाजसेवक होते. त्यांचा वारसा पुढील पिढीला प्रेरणा देईल, असा विश्वास उद्योगपती गौतम सिंघानिया यांनी व्यक्त केला. भारतीय वस्त्रोद्योग क्षेत्रात रेमंड हा एक नावाजलेला उद्योग समूह आहे. या समुहाचे नेतृत्व अनेक वर्षे विजयपत सिंघानिया यांनी केले. सिंघानिया यांनीच निवृत्ती होत काही वर्षांपूर्वी समुहाची जबाबदारी मुलाकडे अर्थात गौतम सिंघानिया यांच्याकडे सोपवली. पण लवकरच मुलाचे आणि त्यांचे वाद सुरू झाले. संपत्तीच्या मुद्यावरून वाद विकोपाला गेला. यानंतर विजयपत सिंघानिया आणि गौतम सिंघानिया या पितापुत्रात कायमचा दुरावा निर्माण झाला.

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या पालखीचे पुण्यात उत्साहात स्वागत

**तभा वृत्तसेवा**

**अक्कलकोट, दि. २९ मार्च :** अनंत कोटी ब्रम्हांडनायक, राजाधिराज योगीराज सद्गुरू श्री स्वामी समर्थ महाराज की, जय...! च्या जय घोषात श्री क्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या पालखीचे पुण्यात मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. पुण्यातील परिक्रमा मार्गावर पालखी पादुकाचे दर्शन घेण्यासाठी शेकडो पुणेकरांनी दुतर्फा गर्दी केलेली होती.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांचे पुत्र न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली गेल्या २९ वर्षापासून पालखी पादुका परिक्रमा ही महाराष्ट्रासह कर्नाटक, गोवा या दोन राज्यात जात असते, श्री क्षेत्र अक्कलकोट येथून नोव्हेंबर २०२५ पासून सुरु झालेली परिक्रमा ही दि. १५ जुलै २०२६ रोजी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे विसावणार आहे. दरम्यान ही परिक्रमा गेल्या ४ महिन्यात पश्चिम महाराष्ट्रासह कर्नाटक, गोवा या राज्यातून तळकोकणातून पुणे येथे पोहोचली आहे. या नंतर नवी मुंबई, बृहन्मुंबई कडे मार्गस्थ होणार आहे.

अवधूत चिंतन श्री गुरु देव दत्त सद्गुरू श्री स्वामी समर्थ महाराज की, जय...! च्या जयघोषात अन्नछत्र मंडळाच्या पालखी पादुका परिक्रमेच्या आगमनाने पुणे शहर भक्तीरसात रंगले असून, श्री स्वामी समर्थ महाराजांचा जय घोष, रांगोळीच्या पायघड्या आणि पुष्पवृष्टी पुणेकरांनी उस्पुर्त पणे उत्साहात स्वागत केले.फुलाने सजविलेल्या पालखीच्या दर्शनासाठी भक्तांची मोठी गर्दी झाली होती. श्री क्षेत्र अक्कलकोट येथून आलेली पालखी मंडईतील श्री शारदा गजानन मंदिरापासून वाजत–गाजत निघाली. शहरातील प्रमुख मार्गावरून शोभा यात्रा काढण्यात आली असून, ठिकठिकाणी भाविकांनी पुष्पवृष्टी व रांगोळ्यांनी पालखीचे स्वागत केले. कार्यक्रमाचे आयोजन




अण्णा थोरात, विनायक घाटे, नामदेवराव मोहिते, राजाभाऊ वरखडे, विलास चव्हाण यांनी केले आहे. या प्रसंगी शोभा यात्रा पुणे महानगरपालिकेचे महापौर मंजुषा नागपुरे, आमदार हेमंत रासने यांच्या हस्ते तर पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक राघवेंद्र मानकर, ॲड. कुणाल टिळक, नगरसेविका स्वरदा बापट, स्वप्नाली पंडित हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

पालखी पादुका दर्शन सोहळा, संस्कृती कार्यक्रम पुरस्कार सोहळा संपन्न झाला. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये स्वामी भक्ती गीते हर्षद कुलकर्णी यांचे तर बाळासाहेब परदेशी यांचे साई नवनाथ भजनी मंडळाचा भजन कार्यक्रम, योगेश तपस्वी यांचा स्वामी गीत सुगंध, स्वरसमर्थ भक्ती गंधर्व मुकुंद बादरायणी यांनी सदर केले.या बरोबरच श्री स्वामी समर्थ पुरस्कार ज्ञानेश्र्वर माऊली टाकळकर तर सेवा पुरस्कार दिपक वायकर यांना स.भ.मोहन बुवा रामदासी, समर्थ रामदास स्वामी मठ क्षेत्र खातगांव जि. अहिल्यानगर, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, पुणे पोलीस उपायुक्त परीमंडल १ ऋषिकेश रावले, पुणे येथील श्री अक्कलकोट स्वामी समर्थ ट्रस्ट चे संस्थापक अध्यक्ष वीरेंद्र किराड, पुणे महानगरपालिका स्थायी समितीहे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत सत्कार सोहळा संपन्न झाला.

सामुदायिक महाआरती सोहळा हा पुणे म.न.पा. नगरसेविका प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे, मसोबा देवस्थान खारावडेच्या अध्यक्षा मधुरा भेलके या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. दरम्यान श्री स्वामी समर्थ मंडपा मध्ये श्री स्वामी समर्थ पादुका अभिषेक सामुदायिक आरती, रक्तदान सोहळा संपन्न झाला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पुण्याचे श्रीपाद थोरात, बाबा रोटे, राजाभाऊ शिर्के, माऊली लोणारे, केंपन्ना नाईक, संदीप चव्हाण, संदीप कोकाटे, सचिन परदेशी, लाला गायकवाड, किशोर म्हस्के, उमेश बने, डॉ. संजय खेडेकर, सुरज थोरात, प्रथमेश घाटे, भगवान बलकवडे, बाळू गौडा, हरीश उर्फ दादा मोरे, नारायणराव चांदणे, नंदू कटके, युवराज चिकणे, सिद्धांत (स्वामी) काजळे, कौशल्य सलीम शेख, सोहम वरखडे, श्री क्षेत्र अक्कलकोटचे महाराष्ट्र पालखी परिक्रमा संयोजक संतोष भोसले, पुरोहित संजय कुलकर्णी आदिजणानी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त...

### वारकरी संप्रदायातील मुंडे यांचे निधन

**परभणी,दि.२७(प्रतिनिधी) :** वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व अभिमन्यू अंबाजी मुंडे (वय ७३, रा. डोंगर जवळा, ता. गंगाखेड, जि. परभणी) यांचे रामायण शक्ती कार्यक्रमादरम्यान पोथी सांगत असताना निधन झाले. त्यांच्या निधनाने वारकरी संप्रदायात हळहळ व्यक्त होत आहे.

मुंडे हे सध्या परभणीतील शेषराव भाऊ नगरी येथे वास्तव्यास होते. तालुक्यातील तट्टू जवळा येथे भव्य रामायण शक्ती कार्यक्रमात पोथी वाचन करत असताना त्यांना देवाज्ञा झाली. त्यांचा अंत्यविधी शनिवार २८ मार्च रोजी सकाळी ११ वाजता परभणीतील वैकुंठ धाम स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात पार पडला. अभिमन्यू मुंडे यांनी पोलीस खात्यात ३६ वर्षे सेवा बजावली होती. पोलीस जमादार पदावरून ते २०११ साली सेवानिवृत्त झाले होते. सेवेत असतानाही त्यांना अध्यात्माची विशेष आवड होती. वारकरी संप्रदायाशी त्यांचा घट्ट संबंध असून पंढरपूर वारीत ते नियमित सहभागी होत असत.

त्यांच्या पश्चात पत्नी, मोठे पुत्र प्रा. श्रीधर मुंडे, विजय मुंडे, कन्या सौ. मीरा फड, सौ. शारदा कातकडे, सौ. शुभांगी भेंडेकर तसेच नातवंडे असा परिवार आहे.

### क्षयरोग दिनानिमित्त परभणी मेडिकल कॉलेजमध्ये जनजागृती

**परभणी,दि.२८(प्रतिनिधी):** विश्व क्षयरोग दिवस निमित्त परभणी येथील आर.पी. हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, पेडगाव येथे क्षयरोग (टीबी) प्रतिबंध व जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. यंदाच्या होय! आपण टीबी संपवू शकतो! या जागतिक थीमनुसार विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून कार्यक्रमाला विशेष रंगत आणली.

एमबीबीएस तृतीय वर्षातील निखिल चव्हाण, ओंकार गरुड, अजिंक्य उक्कलकर, सोमेश घाटकर, प्रांजली धोत्रे आणि आदित्य बोराडे या विद्यार्थ्यांनी क्षयरोग विषयावर माहितीपूर्ण पोस्टर व मॉडेल्स सादर केले. त्यांनी आजाराची कारणे, लक्षणे, उपचार पद्धती तसेच प्रतिबंधात्मक उपाय याबाबत उपस्थित नागरिक व रुग्णांमध्ये प्रभावी जनजागृती केली. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी त्यांच्या क्लिनिकल पोस्टिंगमधील अनुभवही मांडले. यामुळे क्षयरोगाचे निदान, रुग्णसेवा आणि उपचार प्रक्रियेबाबत उपस्थितांना उपयुक्त माहिती मिळाली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे सर्वत्र कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमाला डॉ. किरण सागर (विभागप्रमुख, मायक्रोबायोलॉजी), डॉ. रविराज वाळवंटे (विभागप्रमुख, नाटॉमी), डॉ. इम्रान सय्यद (सहाय्यक प्राध्यापक, नाटॉमी), डॉ. शेळके (सहाय्यक प्राध्यापक, पॅथॉलॉजी) तसेच प्रशासकीय अधिकारी श्री. गुणवंत आहिरे उपस्थित होते.

डॉ. किरण सागर आणि गुणवंत आहिरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना क्षयरोग निर्मूलनासाठी जनजागृतीचे महत्त्व अधोरेखित केले. अधिष्ठाता डॉ. प्रमोद शिंदे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत अशा सामाजिक उपक्रमांमध्ये अधिकाधिक सहभाग घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचा समारोप क्षयरोग मुक्त भारत - क्षयरोग मुक्त समाज या संकल्पनेने करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमामुळे परभणी जिल्ह्यात क्षयरोगाविषयी जनजागृतीला निश्चितच बळ मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

### राणीसावरगाव येथील गोशाळेस निवारा शेडसाठी देणगी; भूमिपूजन सोहळा संपन्न

**परभणी,दि.२८(प्रतिनिधी) :** राणीसावरगांव येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज गोशाळेस मुंबई येथील गोभक्त सुभाष चंदुलाल सोनी व केतन चंदुलाल सोनी परिवाराने आपल्या स्व. वडील चंदुलाल राघवजीभाई सोनी तसेच माता इंदुमतीबेन चंदुलाल सोनी यांच्या स्मरणार्थ गोमाता निवारा शेड उभारणीसाठी देणगी दिली.

श्रीराम नवमीच्या मंगलमय निमित्ताने शुक्रवार २७ मार्च रोजी या गोमाता निवारा शेडचे भूमिपूजन वैदिक मंत्रोच्चारात विधीपूर्वक पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात स्वर्गीय माता-पित्यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर पंडित प्रदीप स्वामीजी यांच्या मार्गदर्शनाखाली भूमिपूजन विधी संपन्न झाला.
या कार्यक्रमास सुभाष चंदुलाल सोनी, केतन चंदुलाल सोनी व त्यांचा परिवार, गोभक्त प्रशांत विनूभाई ठक्कर (ऑनलाइन उपस्थिती), तसेच गोशाळा संचालक मारोती अप्पा कोरे, गोसेवक शिवप्रसाद कोरे, ओमकार कोरे, साई खंदारे, रानबा पात्रे, जयवंत कचवे आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी सोनी परिवाराच्या या सेवाभावी उपक्रमाचे कौतुक करत, आई-वडिलांच्या स्मरणार्थ केलेले हे गोसेवेचे कार्य अत्यंत पुण्यदायी व प्रेरणादायी आहे, असे मत व्यक्त केले.

दरम्यान, या सहकार्यामुळे गोशाळेतील गोमातांसाठी सुरक्षित व सुविधायुक्त निवारा उपलब्ध होणार असून गोसेवा कार्य अधिक बळकट होईल, अशी प्रतिक्रिया गोसेवक शिवप्रसाद कोरे यांनी व्यक्त केली.

### निजामाबाद-तिरुपती 'रॉयलसीमा' एक्सप्रेस परभणीपर्यंत वाढवण्याची मागणी

**परभणी,दि.२८(प्रतिनिधी) :** तिरुपती येथे दर्शनासाठी जाणाऱ्या मराठवाड्यातील भाविकांना सध्या थेट रेल्वेची सोय उपलब्ध नसल्याने मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. नांदेड आणि परभणी येथून तिरुपतीसाठी नियमित रोजची रेल्वे नसल्यामुळे, निजामाबाद-तिरुपती 'रॉयलसीमा सुपरफास्ट एक्सप्रेस' ही रेल्वे परभणीपर्यंत वाढवण्याची मागणी आता बालाजी भक्तांकडून होत आहे.

मराठवाड्यातील रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी सुरू करण्यात आलेली नांदेड-मुंबई देवगिरी एक्सप्रेस पूर्वी नांदेड येथून सुटत होती. मात्र नंतर तिचा विस्तार सिकंदराबादपर्यंत आणि पुढे लिंगमपल्लीपर्यंत करण्यात आला. असे असताना हजारो भाविकांना सोयीची ठरू शकणारी निजामाबाद-तिरुपती रॉयलसीमा एक्सप्रेस परभणीपर्यंत का वाढवली जात नाही, असा सवाल आता बालाजी भक्तांकडून उपस्थित केला जात आहे. दररोज मोठ्या संख्येने भाविक तिरुपती येथे दर्शनासाठी जात असतात. रॉयलसीमा एक्सप्रेस परभणीपर्यंत वाढवली गेल्यास या भाविकांना थेट आणि सुलभ प्रवासाची सुविधा उपलब्ध होईल. याशिवाय व्यापारी दृष्टीनेही सिकंदराबादपर्यंतच्या प्रवासासाठी ही रेल्वे उपयुक्त ठरणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. मराठवाड्यातील खासदारांनी हा प्रश्न गांभीर्याने घेत रेल्वेमंत्र्यांकडे पाठपुरावा करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. परभणी जिल्हा भाजप व्यापारी आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रदीप कोकडवार यांनी सांगितले की, ही रेल्वे परभणीपर्यंत वाढवण्यात आल्यास प्रवाशांचा वेळ वाचेल आणि थेट सुविधा उपलब्ध होईल. बालाजी भक्तांना मोठा दिलासा मिळेल.

### सोनपेठ बसस्थानक परिसरात मोफत जार पाणपोई सुरू

**सोनपेठ,दि.२८(प्रतिनिधी) :** वेदांत केसरी श्री रंगनाथ महाराज प्रतिष्ठान सोनपेठ यांच्या वतीने याही वर्षी रामनवमीच्या शुभमुहूर्तावर येथील बसस्थानक परिसरात मोफत जार पाणपोई सुरू करण्यात आली आहे. पाणपोईचे उदघाटन ज्येष्ठ नागरिक नंदकुमार कोटलवार यांच्या हस्ते ब्र.भु. रंगनाथ महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करुन संपन्न झाले. सामाजिक कार्यामध्ये नेहमी आग्रही असलेले येथील श्री रंगनाथ महाराज प्रतिष्ठानच्या वतीने विविध धार्मिक आहे

# काळजाचा थरार! पोटच्या गोळ्यासाठी आईने मारली प्रत्यक्ष नागावरून उडी; जिंतूरमधील येलदरी येथील चित्तथरारक घटना

**जिंतूर,/प्रतिनिधी:-** ''आईचं काळज ते आईचंच!'' याची प्रचिती देणारी एक अंगावर शहारे आणणारी घटना जिंतूर तालुक्यातील येलदरी वसाहतीमध्ये घडली आहे. आपल्या दोन वर्षांच्या चिमुकलीच्या दिशेने येणारा काळ पाहून, एका माऊलीने स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता थेट फणा काढलेल्या नागाच्या अंगावरून उडी मारली आणि आपल्या लेकीला मृत्यूच्या जबड्यातून सुखरूप बाहेर काढले.
नेमकी घटना काय?
येलदरी वसाहतीमधील रहिवासी मोनाली रवी जाधव या शनिवारी सायंकाळी पावणे पाचच्या सुमारास घराच्या मागच्या बाजूला आपली दोन वर्षांची मुलगी रेणुका हिला शौचास बसवण्यासाठी गेल्या होत्या. त्याच वेळी दबा धरून बसलेला एक मोठा जहाल विषारी नाग अचानक रेणुकाच्या अगदी पायापाशी आला.

क्षणार्धात घेतला निर्णय
समोर साक्षात काळ उभा असल्याचे पाहून कोणत्याही सामान्य व्यक्तीची गाळण उडाली असती. मात्र, मोनाली जाधव यांनी क्षणाचाही विलंब न लावता रुद्र अवतार धारण केला. मुलीच्या अंगावर नाग झडप घालणार इतक्यात, मोनाली यांनी चक्क त्या नागाच्या अंगावरून उडी घेतली आणि रेणुकाला अलगत आपल्या कवेत ओढले. आईच्या या साहसामुळे चिमुकल्या रेणुकाचे प्राण थोडक्यात वाचले.
वन विभागाची वेळीच मदत
या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. शेजारी राहणारे प्रवीण मुळी यांनी तत्काळ वन विभागाशी संपर्क साधला. घटनेचे गांभीर्य ओळखून वन विभागाचे अधिकारी व्हि.बी.चाटसे आणि सर्पमित्र प्रमोद भालेराव यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

त्यांनी मोठ्या शिताफीने त्या नागाला पकडले आणि सुरक्षितरीत्या त्याच्या नैसर्गिक अधिवासात (जंगलात) मुक्त केले. ''लेकरावर संकट आल्यावर आई वाघीण होते, हेच आज या माऊलीने सिद्ध करून दाखवले,'' अशी भावना प्रत्यक्षदर्शींनी व्यक्त केली. सध्या संपूर्ण जिंतूर तालुक्यात मोनाली जाधव यांच्या या अचाट धैर्याचे कौतुक होत असून, सोशल मीडियावरही या धाडसी आईवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.





### गॅस एजन्सींज्‌चा निरंकुश व मनमानी कारभार; ग्राहक त्रस्त

**मानवत,/प्रतिनिधी-** गावागावांत केवळ एकच गॅस एजन्सी नियुक्त केल्यामुळे ग्राहकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत असल्याची तक्रार पुढे येत आहे. (इंडियन गॅस) व (एचपी गॅस) यांच्या वितरण व्यवस्थेमुळे अप्रत्यक्षपणे एकाधिकारशाही वाढीस लागल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.
ग्राहकांचे म्हणणे आहे की, एजन्सीधारक जनतेच्या सोयीपेक्षा स्वतः च्या उत्पन्नवाढीकडे अधिक लक्ष देतात. सुरुवातीला घरपोच गॅस वितरणाची सुविधा दिली जाते; मात्र परिस्थिती बदलल्यावर अचानक घरपोच सेवा बंद केली जाते. त्यामुळे विशेषतः वरिष्ठ नागरिकांना व महिलांना वारंवार एजन्सीकडे चकरा मारूनही वेळेवर गॅस मिळत नसल्याची समस्या निर्माण झाली आहे.
दरम्यान, कंपनीच्या सूचनेनुसार दिनांक ८ रोजीच्या इन्व्हॉइस क्रमांक ५-१०६०९४५८७७१९ प्रमाणे 'डिलिव्हर' दाखवण्यात आलेला मानवत येथील ग्राहकाचा सिलिंडर प्रत्यक्षात आजतागायत मिळालेला नसल्याची गंभीर तक्रार संबंधित ग्राहकाने केली आहे. यामुळे वितरण प्रक्रियेतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.
ाम सोडून नागरिक भर उन्हात त्रस्त या सर्व प्रकाराला आळा घालण्यासाठी कंपन्यांनी वितरण यंत्रणेवर नियंत्रण ठेवावे.

## दुधगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर संपन्न

**जिंतूर,/प्रतिनिधी:** दुधगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर संपन्नक्दिनांक २७ मार्च २०२६ रोजी, तहसील कार्यालय जिंतूर मार्फत उपविभागीय अधिकारी सेलू श्री लाहोटी साहेब व तहसीलदार जिंतूर शितल कच्चवे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर टप्पा १ बाबत जिल्हा परिषद शाळा दुधगांव येथे शिबिर पार पडले.

शिबिरा दरम्यान उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, ॲग्री स्टॅक कार्ड, पी एम किसान योजना, नवीन अकृषिक



धोरण, सातबारा दुरुस्ती, फेरफार , जमीन मोजणीचे अर्ज, विविध विभागांच्या योजना बद्दल माहिती देण्यात आली. तसेच उपस्थित लाभार्थी प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. कार्यक्रमासाठी उपविभागीय अधिकारी श्री शैलेश लाहोटी, तशिलदार जिंतूर सौ शितल कचवे मॅडम, बोरी पोलीस निरीक्षक थोरवे साहेब, नायब तहसीलदार श्री. गायकवाड साहेब. मंडळ कृषी अधिकारी श्री कदम साहेब तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक श्री अशोकराव दुधगावकर, दुधगावचे सरपंच श्रीमती भवाल ताई, पंचायत समिती सदस्य बाळासाहेब साखरे, हे उपस्थित होते. समाधान शिबिर यशस्वी करण्यासाठी दुधगाव मंडळातील तलाठी श्री रोहन पवार, श्री रुपेश वावळे, सौ. शिल्पा घाटूल, सौ. प्रज्ञा गायकवाड, कुमारी ऋतुजा भालेराव, यांनी नियोजन केले. तसेच तहसील कार्यालयातील कर्मचारी अमोल होळंबे आणि महसूल मंडळ अधिकारी दुधगांव श्री विठ्ठल बडगुजर, जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक श्री शहाणे सर यांनी शिबिर यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

## आरपीएफची तत्पर कारवाई : पूर्णा व परभणी स्थानकावर दोन महिलांना सुरक्षीत मदत

**परभणी,/प्रतिनिधी :** पूर्णा व परभणी रेल्वे स्थानकांवर रेल्वे सुरक्षा बलाने (आरपीएफ) तत्परता दाखवत दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये महिलांना सुरक्षित ताब्यात घेत कुटुंबीयांच्या स्वाधीन केले. या कारवाईमुळे आरपीएफच्या संवेदनशील आणि जबाबदार भूमिकेचे पुन्हा एकदा दर्शन घडले आहे.

शुक्रवारी दुपारी सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास पूर्णा रेल्वे स्थानकावर कर्तव्यावर असलेल्या महिला कॉन्स्टेबल गुड्डीबाई मीणा यांना एका व्यक्तीकडून माहिती मिळाली की, एक युवती घरातून पळून येऊन स्थानकावर आली आहे. माहिती मिळताच त्यांनी तात्काळ प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर जाऊन संबंधित युवतीला सुरक्षितपणे आरपीएफ ठाण्यात आणले. चौकशीदरम्यान युवतीने ती मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) परिसरातील रहिवासी असल्याचे सांगितले. घटनेची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आली. त्यानंतर युवतीची शासकीय रुग्णालय, पूर्णा येथे वैद्यकीय तपासणी करून तिचे फिटनेस प्रमाणपत्र घेण्यात आले. पुढील काळजी व आवश्यक कार्यवाहीसाठी तिला 'सखी वन स्टॉप सेंटर, परभणी' यांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

दरम्यान, दुसऱ्या एका घटनेत पंजाब राज्यातील बठिंडा येथील एक महिला मानसिक तणावामुळे हजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानकावरून बेपत्ता झाल्याची माहिती आरपीएफला मिळाली होती. ती बेंगळुरू-नांदेड एक्सप्रेसने प्रवास करत असल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर परभणी रेल्वे स्थानकावर कर्तव्यावर असलेले हेड कॉन्स्टेबल अविनाश पाटील व महिला कॉन्स्टेबल मुक्ता भिसे यांनी ट्रेन स्थानकात दाखल होताच सखोल तपासणी केली. तपासादरम्यान संबंधित महिला एका डब्यात सुरक्षित अवस्थेत आढळून आली. तिला आरपीएफ ठाण्यात आणून चौकशी करण्यात आली व तिच्या कुटुंबीयांशी संपर्क साधण्यात आला. सर्व आवश्यक औपचारिकता पूर्ण करून संबंधित महिलेला तिच्या पतींच्या स्वाधीन करण्यात आले.

दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात आरपीएफकडून 'ऑपरेशन डिग्निटी' अंतर्गत प्रवाशांच्या सुरक्षा व सन्मानासाठी सातत्याने विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत अशा प्रकारच्या प्रभावी कारवायांमुळे गरजू प्रवाशांना तातडीने मदत मिळत असून, आरपीएफच्या कार्याबद्दल प्रवाशांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती अध्यक्षपदी गुणीरत्न वाकोडे



**जिंतूर,/प्रतिनिधी-** येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीच्या अध्यक्ष पदी सर्वानुमते गुणीरत्न वाकोडे यांची निवड करण्यात आली आहे. सदरील बैठकीस समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या विषयी सविस्तर माहिती अशी की जिंतूर नगरपरिषदेच्या प्रांगणातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ मोहन घनसावध यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीत सर्वानुमते यावर्षी संपन्न होणाऱ्या भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी गुणीरत्न वाकोडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

तसेच उपा उपाध्यक्ष म्हणून कर्मवीर घनसावत प्रकाश वाव्हळे, तर सचिव म्हणून बलवान वाकळे सर कोषाध्यक्ष लखन निकाळजे, सहसचिव प्रकाश नवसागर, कार्याध्यक्षपदी गणेश काकडे, विकास अण्णा मोरे तर सहकोशाअध्यक्ष स्वप्निल रायबोले यांची निवड सर्वांना मते करण्यात आली आहे. १३५ व्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवानिमित्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी जिंतूर शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती वर्षी ११ एप्रिल ते १४ एप्रिल दरम्यान भरगच्च असे सांस्कृतिक कार्यक्रम व समाज प्रबोधनाचे ऊत्कृष्ट कार्यक्रमाचे आयोजन करणार असून १४ एप्रिल रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची ढोल ताशाच्या गजरात वाजत गाजत भव्य मिरवणूक काढणार असल्याची माहिती उत्सव समितीचे अध्यक्षआहेत.

## सोनपेठात अवैध रेती वाहतुकीवर कारवाई ७० लाख ७२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**बाबासाहेब गर्जे**
**सोनपेठ,/प्रतिनिधी:** अवैध रेती वाहतूकदारांनी जिल्ह्यात सर्वत्र हैदोस घातला असून, त्यांना आवर घालण्यासाठी आता सोनपेठ चे पोलीस निरीक्षक अशोक गीते हे ॲक्शन मोडवर आले आहेत. त्यांनी आपल्या पोलीसी खाकीचा बडगा उगारत शनिवार दि. २८ मार्च रोजी जिल्ह्यात अवैध रेती उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी सुरू असलेल्या मोहिमेत प्रभावी कारवाई करुन दोन हायवा वाहनांसह अंदाजे ७० लाख ७२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यांच्या या कारवाईने वाळू तस्करांचे धाबे चांगलेच दणाणले असून त्यांच्या या कारवाईचे सामान्य नागरिकातून स्वागत होत आहे.

मागील काही दिवसांपासून सोनपेठ तालुक्यात छुप्या पद्धतीने अवैद्य रेती वाहतूकदार सक्रिय झाले होते. याची चाहूल



सोनपेठ पोलिसांना लागतात सोनपेठ चे पोलीस निरीक्षक अशोक गीते या अवैद्य रेती उत्खनन व वाहतुकीला रोक लावण्यासाठी एक पाऊल पुढे सरसावले आहेत. त्यांनी शनिवारी संध्याकाळी सोनपेठ तालुक्यातील वंदन फाटा येथील गंगाखेड रोडवर ही कारवाई केली आहे. या कारवाई दरम्यान त्यांनी रेतीची चोरटी वाहतूक करत असलेले विना पावतीचे दोन हायवा टिप्पर पकडून सोनपेठ पोलीस ठाण्यात जप्त केले आहेत. त्यामुळे अवैध रेती वाहतूकदारांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत.ही कारवाई परभणीचे पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली सोनपेठचे पोलीस निरीक्षक अशोक गीते यांनी स्वतः पुढाकार घेऊन पोलीस उपनिरीक्षक अजय किरकन व ईतर सोनपेठ पोलीसांच्या सोबत केली. शनिवारी सायं. ०६:४५ वा. सुमारास मौजे वंदन गावाजवळ, गंगाखेडसोनपेठ रोडवर अंदाजे दीड किलोमीटर अंतरावर दोन हायवा वाहने पोलिसांनी तत्काळ थांबवून तपासणी केली. तपासणी दरम्यान सदर वाहनांमध्ये मौजे महातपुरी परिसरातील गोदावरी नदीपात्रातून विनापरवाना उत्खनन करून काढलेली अंदाजे प्रत्येकी ६ ब्रास अशी एकूण १२ ब्रास रेती आढळून आली. यामध्ये वापरण्यात आलेली वाहने हायवा वाहन क्रमांक २२ १०११ व २६ ९७०७ अशी असून दोन्ही वाहन वाहनाचे चालक १) शेख शमीन शेख अब्दुल शकील (रा. गंगाखेड) आणि २) शेख असलम मगदुम पठाण (रा. गंगाखेड) यांना घटनास्थळावरून ताब्यात घेतले. सदर कारवाईदरम्यान दोन्ही टाटा हायवा व त्यामधील रेती असा एकूण अंदाजे ₹७० लाख ७२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल पंचनामा करून जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपींविरुद्ध कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं तसेच कलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल कायदा अन्वये सोनपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

याद राखा?अवैध रेती उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही अशाच प्रकारे कठोर कारवाई सुरूच राहणार राहणार आहे. विना पावती, विनापरवाना कुठलेही गौण खनिज उत्खनन करताना किंवा वाहतूक करत असताना आढळून आल्यास त्याची कुठलीही गय न करता कठोर कारवाई करण्यात येईल. सोनपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये अवैद्य धंदेवाल्यांच्या विरोधात यापुढे अशाच कारवाया होत राहतील. त्यामुळे अशा नियमबाह्य धंदे करणारांनी नोंद घ्यावी.
-अशोक गिते, पोलीस निरीक्षक सोनपेठ.

रोखठोक

दिनेश गुणे

# महाराष्ट्रातील संस्कृतिसंघर्ष

'खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावे' प्रतिभावंत संवेदनशील समाजसुधारक साने गुरुजी यांच्या मानवतेचे अध्यात्म सांगणाऱ्या या काव्याच्या ओळी ओठावर खेळवत महाराष्ट्राच्या अनेक पिढ्या सुसंस्कारित झाल्या. महाराषष्ट्र धर्माची पताका फडकवत ठेवणाऱ्या संस्कारांची शिदोरी या शिकवणुकीने मनामनाच्या झोळीत जमा झाली. काळ कसा बदलत जातो पाहा. आता या ओळी गुणगुणताना, खरा तो हा शब्द उच्चारल्यानंतर, कोणा खराताची आठवण व्हावी आणि बदलत्या काळासोबत सुरू झालेल्या संस्कृतीच्या ऱ्हासाने मने खंतावत जावीत असे काहीसे चित्र आता दिसू लागले आहे. महाराष्ट्राच्या समाजजीवनाची काही वैशिष्ट्ये आहेत. या समाजजीवनात दोन संस्कृतींचा सुंदर मिलाफ झालेला दिसतो. यापैकी एक संस्कृती अध्यात्माची आहे, तर दुसरी संस्कृती मनोरंजनाची आहे. एकाच समाजजीवनातील या दोन संस्कृतींचे प्रवाह समंजसपणे हातात हात घालून पिढ्यापिढ्यांपासून वाहत आले, पण त्यामध्ये कधीही संघर्ष झाला नाही. ज्या अभिमानाने महाराष्ट्र अध्यात्म संस्कृतीचा उल्लेख टाळ संस्कृती असा करतो, त्याच अभिमानाने महाराष्ट्राच्या लोककलांना आश्रय देऊन त्यांचा आदर करणाऱ्या चाळ संस्कृतीचा उल्लेखही केला जातो. सकाळी, सणासुदीच्या दिवसांत आणि धार्मिक वातावरणात ज्या श्रद्धेने महाराष्ट्राच्या गावोगावीच्या मंदिरांत घुमणारे टाळ चिपळ्यांचे नाद आध्यात्मिकतेची साक्ष देतात, त्याच गावात, संध्याकाळच्या समयी एखाद्या जत्रेत रंगणाऱ्या फडात घुमणाऱ्या चाळ-घुंगरांचा नाद राज्याच्या लोकसंस्कृतीची साक्ष देतात. मात्र, हातात हात घालून एकमेकांसोबत चालणाऱ्या या दोनही संस्कृतींचा कधीही संघर्ष झाला नाही. या दोन्ही संस्कृतींनी एकमेकांचा आदर केला आणि त्या संस्कृतीच्या साधकांनी दोनही संस्कृतींची पालखी आलटून पालटून खांद्यावर वाहत पुढच्या पिढ्यांच्या हाती सोपविली. आता काळ बदलला. संस्कृतिसंगमाचा हा संस्कार संपुष्टात येत चालला असून संस्कृतिसंघर्षाचा काळ सुरू झाल्याचे चित्र महाराष्ट्राला काहीसे विषण्ण करणारे ठरू पाहत आहे. महाराष्ट्राच्या या संस्कृतिसंगमालाच, महाराष्ट्र धर्म म्हणून कौतुकाने म्हटले जात होते. आजही अनेकांच्या मुखातून महाराष्ट्र धर्माचा गजर होत असतो. महाराष्ट्र धर्म जपण्याची गरजही वारंवार व्यक्त होत असते. पण वर्तमानात जे काही पाहावयास मिळते, ते म्हणजे महाराष्ट्र धर्म नाही, याची जाणीव त्रासदायक आहे. खरा तो एकच धर्म असे म्हटल्यावर कोणा खराताच्या नवउद्योगांचे चित्र नजरेसमोर यावे, या एकाच बाबीतून ही उद्वेगजनक वस्तुस्थिती आता महाराष्ट्र अनुभवत आहे. ही स्थिती म्हणजे, एक प्रकारे महाराष्ट्रातील संस्कृतिसंघर्ष आहे. हे सांस्कृतिक परिवर्तन नव्हे, तर संस्कृतीच्या विनाशाची वाटचाल ठरणार आहे. परिवर्तनाच्या प्रक्रियेत जुन्या गोष्टी नव्या तेजाने अधिकाधिक उजळ होत असतात. असे परिवर्तन त्या गोष्टींचे गुण अधिक समृद्धही करत असतात. नव्या संस्कृतिसंघर्षात दिसणारे परिवर्तन ओंगळवाणे आहे. बदलाची ही प्रक्रिया समाजजीवनाचे संस्कार उजळणारी नव्हे, तर काळवंडून टाकणारी आहे. म्हणून, खरातसारख्या प्रकरणांबाबत समाजाने सजग असावयास हवे. महाराष्ट्र धर्मास काळिमा फासणाऱ्या अशा प्रवृत्ती ही एक सामाजिक विषवल्ली आहे. अशा विषवल्ली वेळीच ठेचून काढल्या पाहिजेत, असे मत यापूर्वी अनेकदा महाराष्ट्राच्या कायदेमंडळात उभय बाजूंनी व्यक्त केले जात होते. आजही त्याबाबत दुमत दिसत नाही. तरीही, कायदेमंडळाच्या घुमटाखालीदेखील विषवल्लींचा शिरकाव होण्याच्या भीतीचे संकेत देणाऱ्या काही घटना घडताना दिसतात, तेव्हा विषवल्ली ठेचण्याचे काम सोपे नाही, ते एक आव्हान आहे आणि ते सामूहिकरीत्या, एकत्रितपणे आणि निर्धारपूर्वकच पार पाडले पाहिजे, ही बाब अधोरेखित होते.



महाराष्ट्राच्या विधिमंडळातील अर्थसंकल्पीय अधिवेशनातील कामकाजाच्या अखेरच्या आठवड्यावर याच संस्कृतिसंघर्षाच्या चिंतेचे सावट दाटले होते. चमत्कार, बुवाबाजीच्या नावाने समाजाला वेठीस धरणाऱ्या, महिलांच्या मानसिक किंवा अन्य कोणत्याही अपरिहार्यतेचा गैरफायदा घेत आपल्या विकृत कामना पूर्ण करून धनाच्या राशी गोळा करणाऱ्या कोणा कॅप्टन खरात नावाच्या एका भोंदूने आध्यात्मिकतेचा आव आणत समाजाच्या श्रद्धांना वेठीस धरले आणि महाराष्ट्र धर्माची परंपरा एका परीने पुरती लयास गेली. असे प्रकार याआधीही महाराष्ट्रात घडले आहेत आणि ते उघडकीस आल्यानंतर प्रत्येक वेळी महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा आणि संस्कारांच्या इतिहासाचे पाढे वाचले गेले आहेत. अशा प्रकारांनी यावरच घाला घातल्याची चिंता व्यक्त झाली आहे आणि काळ पुढे सरकताच, त्या गोष्टी इतिहासजमा होऊन त्याच्याच पुनरावृत्तीची आठवण करून देणाऱ्या नव्या गोष्टी घडत गेल्या आहेत. अशा घटनांच्या इतिसाहात डोकावून पाहिले, तर खरात नावाच्या भोंदूने महाराष्ट्राला दिलेला सांस्कृतिक धक्का ही एका परीने त्याच इतिहासाची पुनरावृत्ती ठरेल. म्हणूनच, महाराष्ट्राच्या विधिमंडळात कामकाजाच्या अखेरच्या आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याच मुद्यावरील एका चर्चेवरील उत्तरात व्यक्त केलेल्या भावना हे या संस्कृतिसंघर्षाच्या संकेतांची चिंता व्यक्त करणारे ठरले. कारण, व्यक्ती किंवा समाजाचे चारित्र्य हीच जेव्हा सापेक्ष आणि संशोधनाची बाब ठरते, तेव्हा कोणास चारित्र्यवान ठरवावे वा कोणास चारित्र्यहीन ठरवावे याचाच संभ्रम वाढण्याची आणि कालपरवापर्यंत अनैतिक मानल्या जाणाऱ्या एखाद्या धंद्यांवरही चारित्र्याचा मुलामा चढविण्याची चढाओढ सुरू होणे हा शहाजोगपणा ठरण्याचीच शक्यता अधिक! मुळात चारित्र्याच्या संकल्पनाच व्यक्ती, समूहाच्या विचार-संस्कारांनुसार वेगवेगळ्या असतात. चारित्र्याच्या परंपरागत समजुतींनुसार, ज्या ठिकाणी चारित्र्यवान व्यक्ती असणे अपेक्षित असते, तेथे बसणाऱ्यांकडून अनेकदा अपेक्षाभंगाचेच दुःख पदरी पडल्याचा अनुभव येत असतो. मंदिराचे पुजारी भाविकांची हत्या करतात आणि मंदिरांच्या आवारात, मूर्तींच्या पायाशी मृतदेहांची विल्हेवाट लावतात अशा बातम्या जेव्हा कानावर आदळतात, तेव्हा चारित्र्यवान कोणास ठरवावे हा प्रश्न पडून संभ्रमच वाढत असतो. लोकांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेऊन अध्यात्माच्या नावावर दुकाने सुरू करून संस्कृती नासविणारे उद्योग सुरू केले जातात, तेव्हा, ज्या संकल्पनेबाबतचा संभ्रमच अधिक बळावतो. आता तसेच होऊ लागले असल्याने, संस्कृतिसंघर्षाची ही चिंता अधिकच बळावली आहे. म्हणूनच, मुख्यमंत्र्यांच्या त्या भाषणाची नोंद समाजमनात व्हावयास हवी.

गेल्या आठवडाभरात विधिमंडळात खरात प्रकरणाचे वेगवेगळे पडसाद उमटले. अनेक सदस्यांनी चिंता व्यक्त केली. या प्रकरणात दिवसागणिक समोर येणारी माहिती नवनवे धक्के देणारी माहिती समोर येत आहे. २५ मार्च रोजी त्यावर सविस्तर निवेदन करताना मुख्यमंत्र्यांनीही महाराष्ट्र धर्माचा पुनरुच्चार केला. महाराष्ट्राला समासुधारक, संतांची मोठी परंपरा लाभली आहे. या संतांनी अंधश्रद्धांवर कठोर प्रहार केले आहेत याचे अनेक दाखलेही मुख्यमंत्र्यांनी दिले. खरात प्रकरणाची संपूर्ण पाळेमुळे खणून काढून या व्यक्तीला आणि अशा प्रवृत्तींना कायमची जरब बसेल अशी कारवाई केली जाईल, अशी निःसंदिग्ध ग्वाही त्यांनी दिलीच, पण राज्यात जे काही घडते आहे, ते पाहता आपण कोठे जात आहोत याचा विचार करण्याची वेळ आली आहे, अशा शब्दांत त्यांनी बदलत्या सामाजिक परिस्थितिविषयी चिंतादेखील व्यक्त केली. महाराष्ट्र ही सश्रद्ध समाजाची भूमी आहे. पण श्रद्धा आणि अंधश्रद्धा यामधील सूक्ष्म भेदरेषा ओळखली पाहिजे. ती लक्षात आली नाही तर काय स्थिती होते हे खरात प्रकरणातून उघड झाले आहे. एक प्रकारे अंधश्रद्धेमुळे विवेकाचे भान कसे हरवते हे या प्रकरणातून दिसून आले आहे. आपल्या संतपरंपरेने ईश्वराचे अस्तित्व नाकारलेले नाही, तर अंधश्रद्धेवर प्रहार केले. ज्ञानेश्वर माउलींनी विश्वबंधुत्वाचा संदेश दिला, अंधश्रद्धेचा अंधकार नष्ट व्हावा अशी प्रार्थना पसायदानातून केली. तुकोबारायांनी साधूंची लक्षणे दाखवून दिली. आजच्या परिस्थितीत ही संतांची शिकवण महत्त्वाची आहे. खरात प्रकरणातून सरकार आणि समाजासाठी नवी शिकवण मिळाली आहे. महाराष्ट्र धर्म टिकविण्यासाठी, वाढविण्यासाठी अंधश्रद्धा, भोंदूगिरीला स्थान मिळू देऊ नये यासाठी प्रयत्न करण्याची गरजही त्यांनी यावेळी अधोरेखित केली. सध्याच्या फोफावत्या विकृतींच्या संकटात असा सजगपणा दाखविण्यासाठी सरकार आणि समाजाच्याही सावधगिरीची गरज आहे. अन्यथा, ज्यास महाराष्ट्र धर्म म्हटले जाते, ती संस्कृती भविष्यात शोधावी लागेल. सज्ञान व्यक्तीस स्वयंआचरणाचे स्वातंत्र्य असल्याने व त्या स्वातंत्र्याचा त्याने विवेकाने वापर करावा असेच गृहीतच असल्याने विकृतांचे चाळे सुरू झाले तरी समाजाच्या झुंडी तिकडे वळाव्यात असे अजिबातच कोणासही अपेक्षित नसणार. उलट, अशा परिस्थितीत, समंजस समाजाने व व्यक्तींनी नेमका विचार करण्याची गरज अधोरेखित होते. म्हणजे, समजा, एकाच गल्लीत एखादे प्रार्थनास्थळ आहे आणि त्याच्याच शेजारी डान्सबार आहे, तर कोठे जाण्यात आपले हित आहे आणि कोठे जाण्याने आपल्यासह आपल्या कुटुंबीयांसही मनस्ताप होणार आहे, एवढा सारासार विचार करून निर्णय घेण्याची मुभा प्रत्येकाला आहे. अखेर, आपल्या व्यक्तिगत आयुष्याची घडी बिघडवायची की, सांभाळायची हे ठरविण्याएवढा विवेक प्रत्येकासच असतो. तसा विवेक न बाळगल्यास त्याचे परिणाम आपणास भोगावे लागतात, हे प्रत्येकासच स्वच्छपणे अनुभवता येत असते. या प्रकरणातून समोर येणारे नवनवे वास्तवही असेच अनुभव समाजासमोर ठेवणार आहे.

राजकारणात काही शब्द असे असतात, जे काळानुसार अधिक गाजतात; पण त्यांचा अर्थ मात्र धूसर होत जातो. ''महाराष्ट्र धर्म'' हा तसाच एक शब्द ठरू पाहात आहे. सत्ताधारी किंवा विरोधकांकडून वेगवेगळ्या प्रसंगी हा शब्द अभिमानाने उच्चारला जातो. परंतु, या शब्दामागील मूल्यांचा आजच्या वास्तवाशी किती संबंध उरला आहे, हा प्रश्न आजच्या काळातील वास्तवाकडे पाहताना अधिक महत्त्वाचा ठरतो. मुळात, ''महाराष्ट्र धर्म'' ही संकल्पना केवळ धार्मिक नव्हती. ती राज्यकारभारातील नैतिकतेची आणि समाजजीवनातील समतेची होती. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याच्या संकल्पनेत, 'धर्मसंकल्पने'त कर्तव्य, न्याय आणि प्रजाहिताच्या जबाबदारीची जाणीव अधोरेखित झालेली होती. 'हिंदवी स्वराज्य' ही कल्पना कोणत्याही एका धर्माची नव्हे, तर सर्वसामान्यांच्या सन्मानाची होती, तसाच 'महाराष्ट्र धर्म' हा शब्द समावेशक आणि प्रगतिशील होता. हीच परंपरा पुढे संतसाहित्यात अधिक दृढ झाली. संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांच्या विचारांतून समाजाला समतेचा, सहिष्णुतेचा आणि मानवतेचा संदेश मिळाला. जात-पात, उच्च-नीच यांच्या पलीकडे जाऊन 'माणूस' हीच खरी ओळख आहे, हा विचार महाराष्ट्राच्या संस्कृतीचा गाभा ठरला. पुढे महात्मा जोतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्यायाच्या लढ्यातून या 'महाराष्ट्र धर्मा'ला आधुनिक अर्थ दिला. आजकाल मात्र, हा शब्द अनेकदा भावनिक आवाहनापुरताच संकुचित होत असावा असे दिसते. यामुळे या शब्दाच्या मूळ संकल्पनेचा गाभाच हरवेल की काय, अशी भीतीही व्यक्त होते. कारण, महाराष्ट्र धर्म या संकल्पनेत महाराष्ट्राच्या संस्कृतिसंगमाचा इतिहास आहे. हा शब्द या परंपरा आणि संस्कृतीचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प ठरला पाहिजे. आजच्या वास्तवाचे चित्र मात्र, काहीसे संमिश्र दिसते. एका बाजूला महाराष्ट्र औद्योगिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात देशात आघाडीवर आहे. विविधतेला स्वीकारण्याची परंपरा अजूनही टिकून आहे. परंतु दुसऱ्या बाजूला, जातीय तणाव, ग्रामीण-शहरी दरी, शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारी आणि राजकीय ध्रुवीकरण या समस्या ठळकपणे दिसतात. समाजजीवनातील पारदर्शकतेचा अभाव आणि शासन, प्रशासनातील सुशासनाचा अभाव, अंधश्रद्धा, काळी जादू आदींचा सुळसुळाट आणि थेट शासकांच्या शयनगृहापर्यंत पोहोचलेल्या अनैतिकतेच्या व्यवहारांचे आरोप यामुळे जनतेचा परस्परांवरील विश्वासही डळमळीत होताना दिसतो. बुवाबाजी किंवा भोंदूगिरीसारखे संस्कृतीला आव्हान देणारे धंदे कधीच एकट्या व्यक्तीच्या जोरावर उभे राहत नाहीत. त्यामागे अनेक अदृश्य शक्तींच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष संरक्षणाचे कवच असते. या संरक्षणामुळेच, बुवाबाजी हा केवळ आध्यात्मिक क्षेत्रास विळखा घालणारा उद्योग राहिलेला नाही. तो एक संघटित, आखणीबद्ध पद्धतीने चालविणारा जाणारा, सत्ता, संपत्ती यांच्या जोरावर समाजावर वर्चस्व गाजविणारा कॉर्पोरेट धंदा बनू पाहत आहे. अशा परिस्थितीत, 'महाराष्ट्र धर्म' हा शब्द केवळ घोषणांपुरता मर्यादित राहता कामा नये. तो आचरणात आला पाहिजे, अशी भावना बळावत जाते. समाजात विषमता वाढत असेल, दुर्बल घटकांना न्याय मिळत नसेल, सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा कमी होत असेल आणि श्रद्धा आणि अंधश्रद्धांमधील सूक्ष्म भेदरेषेच्या काठावरच्या सामान्यांचे धर्म, भक्तीच्या नावावर पिळवणूक, शोषण होत असेल, तर 'महाराष्ट्र धर्म' हा शब्द केवळ प्रतीकात्मक उरतो. हा शब्द म्हणजे महाराष्ट्राच्या अभिमानाचा विषय ठरावा, यासाठी तो केवळ इतिहासाचा वारसा म्हणून नव्हे, तर वर्तमानातील कृतीतून जपला गेला पाहिजे. समाजात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवले पाहिजे, समाजाने परंपरेने जतन केलेली समतेची सांस्कृतिक मूल्ये प्रत्यक्षात आणली पाहिजेत. शिक्षण, सामाजिक न्याय आणि आर्थिक संधी यामध्ये सर्वसमावेशकता निर्माण झाली, तरच महाराष्ट्र धर्म खऱ्या अर्थाने जिवंत राहील. अन्यथा, तो इतिहासाच्या गौरवगाथेतला एक सुंदर पण अपूर्ण अध्याय ठरेल.

dineshgune@gmail.com

रविवारची पत्रे

## अंधश्रद्धा, भोंदू आणि सुज्ञ समाजाची गरज

भारतात 'आध्यात्मिक मार्गदर्शक' यांच्या नावाखाली घडणाऱ्या वादग्रस्त आणि धक्कादायक घटना आता नवीन राहिलेल्या नाहीत. वेळोवेळी अशा अनेक प्रकरणांचा पर्दाफाश होतो आणि समाजाला धक्का बसतो. सध्या चर्चेत असलेले कॅप्टन अशोक प्रकरण असो किंवा यापूर्वी उघडकीस आलेली अनेक प्रकरणे असोत, या सर्व घटनांमधून एक गोष्ट स्पष्ट दिसून येते की अंधश्रद्धा आणि आंधळा विश्वास यांचा गैरफायदा घेणारी मंडळी समाजात सक्रिय आहेत. ही समस्या केवळ एका धर्मापुरती मर्यादित नाही; सर्व धर्मांमध्ये अशा प्रकारच्या घटना कधी ना कधी समोर येताना दिसतात. आध्यात्मिकतेच्या नावाखाली लोकांना फसवण्याचा हा प्रकार समाजासाठी चिंतेचा विषय आहे.

मानवाच्या आयुष्यात अध्यात्माला आणि श्रद्धेला एक महत्त्वाचे स्थान आहे. संकटाच्या काळात किंवा मानसिक अस्थिरतेच्या काळात माणूस एखाद्या आध्यात्मिक आधाराच्या शोधात असतो. ही एक नैसर्गिक आणि मानवी प्रवृत्ती आहे. अनेक संत, विचारवंत आणि आध्यात्मिक गुरूंनी समाजाला योग्य दिशा दिली आहे, लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवले आहेत. परंतु या पवित्र आणि संवेदनशील क्षेत्राचा गैरफायदा घेणारे काही भोंदू लोकही निर्माण झाले आहेत. ते आध्यात्मिकतेचा मुखवटा लावून लोकांच्या भावना, श्रद्धा आणि अडचणींचा वापर स्वतःच्या स्वार्थासाठी करतात.

आज प्रश्न असा निर्माण होतो की हे भोंदू लोक इतक्या सहजपणे लोकांना कसे फसवू शकतात? विशेषतः आश्चर्याची गोष्ट म्हणजे अनेकदा या जाळ्यात सापडणारे लोक सुशिक्षित असतात. चांगल्या पदांवर काम करणारे, उच्च शिक्षण घेतलेले किंवा आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेले लोकही या प्रकारांना बळी पडतात. यामागे केवळ अज्ञान नसून मानसिक आणि सामाजिक कारणेही असतात. अनेक वेळा लोक वैयक्तिक अडचणी, कौटुंबिक समस्या, आर्थिक ताण किंवा आरोग्याच्या समस्या यामुळे अस्वस्थ असतात. अशा वेळी एखादी व्यक्ती ''मी तुमच्या सर्व समस्या दूर करतो'' असे सांगते, तेव्हा त्या व्यक्तीवर विश्वास ठेवण्याची प्रवृत्ती वाढते.

समाजाला फक्त शिक्षित नव्हे तर सुज्ञ असणे गरजेचे आहे. सुज्ञ समाज म्हणजे असा समाज जो कोणतीही गोष्ट आंधळेपणाने स्वीकारत नाही. तो प्रश्न विचारतो, विचार करतो आणि मग निर्णय घेतो. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यामध्ये सूक्ष्म पण महत्त्वाचा फरक असतो. श्रद्धा ही विवेकबुद्धीच्या आधारावर असते, तर अंधश्रद्धा विवेकाला बाजूला ठेवून आंधळ्या विश्वासावर आधारित असते. भोंदू किंवा तथाकथित आध्यात्मिक गुरू यशस्वी होण्याचे एक मोठे कारण म्हणजे लोकांचा भावनिक कमकुवतपणा. जेव्हा एखादी व्यक्ती मानसिकदृष्ट्या अस्थिर असते किंवा संकटात असते, तेव्हा तिला त्वरित उपाय हवा असतो. या मानसिकतेचा फायदा घेऊन काही लोक स्वतःला चमत्कारी शक्ती असलेले म्हणून मांडतात. ते लोकांना सांगतात की त्यांच्या सर्व समस्या एका विशिष्ट विधीने किंवा कृतीने दूर होतील. काही वेळा ते भीतीचे वातावरण निर्माण करतात. ''हे केले नाही तर तुमच्यावर संकट येईल'', ''देव रागावेल'' किंवा ''कुटुंबावर विपत्ती येईल''. अशा भीतीमुळे लोक तर्कशुद्ध विचार न करता त्यांचे म्हणणे मान्य करतात. प्रत्येक व्यक्तीने स्वतःला काही प्रश्न विचारणे गरजेचे आहे. मी जे मानतो ते का मानतो? कोणतीही गोष्ट ऐकून मी लगेच विश्वास ठेवतो का? माझा निर्णय भीतीवर आधारित आहे का, की विचारांवर? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे मिळाल्यास अनेक अंधश्रद्धा आपोआप दूर होतील. आजच्या काळात शिक्षण, विज्ञान आणि माहितीची साधने मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. इंटरनेट, पुस्तके आणि विविध माध्यमांमुळे ज्ञान मिळवणे सोपे झाले आहे. तरीही अंधश्रद्धेचे अस्तित्व कायम आहे, याचा अर्थ केवळ माहिती पुरेशी नाही. त्या माहितीचा वापर करण्याची वृत्ती आणि विचार करण्याची सवय विकसित करणे आवश्यक आहे.

**अनिरुद्ध राम निमखेडकर**/९९७०८३५७२४

## चारों जुग परताप तुम्हारा

''चारों जुग परताप तुम्हारा, है परसिद्ध जगत् उजियारा'' अशा शब्दांत हनुमंतरायाचा गौरव गोस्वामी तुलसीदासांनी हनुमान चालीसामध्ये केला आहे. या चौपाईचा भावार्थ लक्षात घेता गोस्वामी तुलसीदास हनुमंतरायांचे गुणगान करताना म्हणतात. चारही युगांचे वैभव हे तुमचेच आहे. आपल्या धर्मग्रंथांमध्ये आणि पुराणांमध्ये हनुमंतांच्या महतीचे सविस्तर वर्णन आले आहे. त्यात असे म्हटले जाते की, चारही युगांमध्ये भगवंत भक्तीचे मूर्तिमंत रूप असलेले, हनुमंत या कलियुगामध्ये जिवंत असून आपल्यामध्ये उपस्थित आहेत. सतयुग, त्रेतायुग, द्वापारयुग आणि कलियुग अशा चार युगांपैकी सतयुगात पवित्र अशा रूपात अस्तित्वात असलेल्या हनुमंताची शिव म्हणून पूजा केली जात जात असे आणि भगवान शिवाच्या आठ रुद्र अवतारांपैकी त्यांना शंकर सुवन, केसरीनंदन या नावाने ओळखले जात असे.



त्रेतायुगात अंजनीसुत हनुमंतांना मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामांचा सहवास व माता सीतेचे प्रेम प्राप्त झाले. याशिवाय रामायणाच्या संदर्भानुसार, प्रभू श्रीराम लंकेवर विजय मिळवून अयोध्येत परत आले आणि सुग्रीव, बिभीषण, अंगद यासारख्या आपल्या वीर सहकाऱ्यांचे आभार मानू लागले. तेव्हा प्रभू श्रीरामाने प्रत्येकाला काहीतरी भेटवस्तू दिल्या. प्रसंगी हनुमंतरायांना भेट देण्याची वेळ आली तेव्हा, प्रभू श्रीरामांनी सांगितले, हे प्रिय हनुमंता! जोपर्यंत या भूतलावर रामकथेचे पठन, श्रवण, गायन होईल तोपर्यंत माझा आत्मा या देहात राहो आणि मी माझ्या भौतिक रूपात प्रत्येक रामकथेत उपस्थित राहून तुमच्या दिव्य खेळाचा आनंद घेत राहील. या प्रभू रामचंद्राच्या विधानामुळे कलियुगी हनुमंतराय चिरंजीव आहेत.

श्रीमद्भगवदानुसार, कलियुगात पृथ्वीवर हनुमंतरायाचे निवासस्थान गंधमाधन पर्वतावर सांगितले जाते. ''धर्म रक्षति रक्षिताः'' हे तत्त्व सर्व मानवी जीवनाचे साधन बनविण्यासाठी हनुमंतराय पृथ्वीवर वास्तव्य करतात. ते धर्म आणि भक्तांचे रक्षण व रामकाजासाठी. कलियुगात भूतलावर हनुमंतरायांनी वास्तव्य केल्याची एक दुसरी कथा सांगितली जाते. गोस्वामी तुलसीदासांनी रामचरित मानसाच्या लेखन व गायनाने प्रसन्न होऊन हनुमंतराय गोस्वामी तुलसीदासांवर प्रसन्न झाले. तेव्हा गोस्वामी तुलसीदास भक्तिभावाने कळवळा करून हनुमंतरायांना म्हणू लागले की, मला प्रभू श्रीरामाचे दर्शन घडवा. गोस्वामी तुलसीदासांच्या विनंतीला हनुमंतराय प्रसन्न होऊन, मोठ्या चलाखीने चित्रकुटात श्रीरामाचे दर्शन घडविले. तसा उल्लेख स्वतः गोस्वामी तुलसीदास रामचरितमानस ग्रंथात करतात. तर द्वापारयुगात महाभारत पर्वकाळात धर्म संस्थापनेसाठी हनुमंतराय अर्जुनाच्या रथाच्या ध्वजावर स्वार झाले होते. हनुमंतरायांचे कार्य केवळ भक्ती, सामर्थ्य, तत्परता, बुद्धिमत्ता, विद्वत्ता, दास्यभक्ती या गुणवैशिष्ट्यानेच परिपूर्ण नसून; तर ते उत्तम कुटनीतीज्ञ, नेतृत्वी, युद्ध कौशल्यकलेने पारंगत होते. याशिवाय हनुमंतरायांच्या कार्याची प्रेरणा म्हणून आज आपणास पारमार्थिक, ऐहिक, आत्मोन्नतीसारख्या सर्व आघाड्यांवर प्रभुत्व आणि अद्भुत व्यवस्थापन शास्त्राचे आत्मदर्शन सुद्धा देते.

**शशिकांत तोटे**/९१३०८३५४५८

## धुरंधरचा क्षात्रधर्म

गुरुवार, १९ मार्च २०२६. भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील एक असा दिवस, ज्याने दशकानुदशके पोसलेल्या सेक्युलर वृत्तीच्या चिंध्या केल्या. धुरंधर २ प्रदर्शित झाला आणि एका क्षणात संपूर्ण देशातील चित्रपटगृहांचे रूपांतर राष्ट्रभक्तीच्या रणांगणात झाले. ज्याप्रमाणे सूर्याच्या उदयाने अंधकाराचे साम्राज्य लयाला जाते, त्याचप्रमाणे धुरंधरच्या या प्रखर राष्ट्रवादाने दशकानुदशके फोफावलेल्या हिंदुद्वेष्ट्या मानसिकतेचा थरकाप उडाला आहे. हा चित्रपट म्हणजे केवळ मनोरंजन नसून, तो या देशातील सांस्कृतिक दहशतवादाविरुद्ध पुकारलेले एक धर्मयुद्ध आहे.

**चित्रपटसृष्टीचा कायापालट** : धुरंधर मालिकेने चित्रपटसृष्टीची बुरसटलेली चौकट मोडून काढली आहे. चित्रपट शुक्रवारीच प्रदर्शित झाला पाहिजे, हा पाश्चिमात्य आणि बॉलिवूडचा नियम मोडून काढत, गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर गुरुवारी चित्रपट प्रदर्शित करण्याचे धाडस आदित्य धर यांनी दाखवले.

**खानदानी कारस्थानाचा अंत आणि हिंदू अस्मितेचा उदय** : दशकानुदशके बॉलिवूडने सलीम-जावेद प्रवृत्तीच्या लेखणीतून एक विशिष्ट अजेंडा राबवला. ज्यामध्ये रहीम चाचा हा देवदूत असायचा आणि कपाळावर टिळा लावणारा हिंदू हा हवस का पुजारी किंवा विश्वासघातकी असायचा. दुसऱ्या बाजूला पडद्यावरचा मुल्ला किंवा मौलवी हा नेहमीच अत्यंत नेक, इमानदार आणि शब्दाचा पक्का दाखवला गेला. हा जो मानसिक गुलामगिरीचा खेळ सुरू होता, त्याला धुरंधरने पूर्णविराम दिला आहे. त्याऐवजी धुरंधरने हिंदूंचे क्षात्रतेज दाखवून दिले. आज चित्रपटगृहात जेव्हा भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार कंधहार प्रकरणातील आतंकवाद्याला गुडघ्यावर टेकवून त्याच्याकडून ''भारत माता की जय'' वदवून घेतात, तेव्हा होणारा टाळ्यांचा कडकडाट हा त्या जुन्या, कुजलेल्या व्यवस्थेच्या कानशिलात लगावणारा एक सणसणीत टोला आहे.

**घुसकर मारेगा** : हा केवळ संवाद नाही, तर वास्तव : उरी आणि पुलवामा येथील भ्याड हल्ल्यांनंतर भारताने केलेले सर्जिकल स्ट्राईक आणि एअर स्ट्राईक हे जागतिक राजकारणातील मैलाचे दगड ठरले. शत्रूला त्याच्या सुरक्षित स्थळी जाऊन कंठस्नान घालण्याची जी क्षमता भारताने दाखवली, तिचेच भव्य दर्शन धुरंधर घडवतो. दहशतवादाशी कोणतीही तडजोड न करण्याचे आणि शत्रूच्या भूमीवर जाऊन त्याचा समूळ नायनाट करण्याचे हे धोरण हिंदू जनमानसाला आश्वासक वाटते. पाकिस्तानमध्ये तिथल्या सरकारने या चित्रपटावर बंदी घातली असली, तरी तिथली जनता चोरून हा चित्रपट पाहत आहे. हाच धुरंधरचा आणि हिंदू विचारांचा विजय आहे.

**नव्या पिढीचे वैचारिक प्रबोधन** : धुरंधरने भारतीयांना एका अत्यंत संवेदनशील आणि विस्मृतीत गेलेल्या वास्तवाची प्रखर जाणीव करून दिली आहे. ती म्हणजे, शत्रूच्या भूमीवर जाऊन स्वतःचा जीव तळहातावर घेऊन लढणारे अज्ञात भारतीय वीर. असे शेकडो रॉ एजंट्स किंवा गुप्तहेर आहेत, जे आपली ओळख पुसून, कुटुंबाचा त्याग करून पाकिस्तानसारख्या नरकामध्ये भारतासाठी डोळ्यांत तेल घालून पहारा देत आहेत. या अनाम वीरांना ना कधी पदक मिळते, ना त्यांचे नाव वृत्तपत्रात येते. मात्र, भारताचे रक्षण करण्यासाठी ते शत्रूच्या गोटात शिरून बलिदान देतात. धुरंधरने या अज्ञात वीरांच्या त्यागाला वंदन केले आहे, ज्यामुळे प्रत्येक भारतीयाच्या मनात या छुप्या सैनिकांबद्दल कृतज्ञतेची भावना जागृत झाली आहे.

**विरोधकांचा जळफळाट** : हा चित्रपट मोदींचा प्रपोगंडा आहे, असे ओरडणाऱ्यांनी हे लक्षात ठेवावे की, जनतेला जे आवडते तो प्रपोगंडा नसून ते सत्य असते. पुढची २५ वर्षे केंद्रात सत्ता मिळण्याची शक्यता मावळल्याने जसे राजकीय विरोधक वैफल्यग्रस्त झाले आहेत, तशीच अवस्था आज हिंदूद्वेष्ट्या निर्मात्यांची झाली आहे. धुरंधरने जे यश मिळवले आहे, त्याच्या आसपासही हे पुरोगामी चित्रपट फिरकू शकत नाहीत. हीच नियतीची चपराक आहे. धुरंधरने सिद्ध केले आहे की, इथून पुढे चित्रपटगृहात केवळ तोच टिकेल, जो या मातीचा आणि संस्कृतीचा सन्मान करेल.

**अपर्णा जगताप**/पुणे

# नवा विचारमार्ग देणारा 'गीता रहस्य'

**लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे स्थान केवळ स्वातंत्र्यलढ्यातील नेते म्हणून मर्यादित नाही. ते एक महान तत्त्वज्ञ आणि समाजमन घडवणारे चिंतकही आहेत. त्यांच्या 'गीता रहस्य'ने भारतीय समाजाला नवा विचारमार्ग दिला. या ग्रंथाच्या निर्मितीमागे दीर्घकाळ चाललेले तात्त्विक चिंतन, गीतेच्या मूळ संदेशाचा शोध आणि समाजाला निष्क्रियतेतून बाहेर काढण्याची तीव्र जाणीव दडली होती. ३० मार्चच्या गीता रहस्य जयंतीनिमित्त घेतलेला वेध.**

लोकमान्य टिळक यांना भगवद्‌गीतेचा परिचय लहान वयातच झाला आणि त्यावेळीच त्यांच्या मनात एक मूलभूत प्रश्न निर्माण झाला. गीता अर्जुनाला युद्धासाठी प्रवृत्त करण्यासाठी सांगितली गेली असताना, तिचा अर्थ कर्मसंन्यास किंवा निवृत्ती असा कसा लावला जातो, याबद्दल त्यांना शंका वाटू लागली. त्या काळात आदी शंकराचार्य यांच्या निवृत्तिमार्गी भाष्यांचा प्रभाव प्रबळ होता आणि मोक्षप्राप्तीसाठी कर्मत्याग आवश्यक आहे, ही धारणा समाजात खोलवर रुजली होती; परंतु टिळकांच्या विवेकशील बुद्धीला हा विचार अपूर्ण वाटत होता. त्यांनी गीतेतील प्रसंग, तिचा ऐतिहासिक संदर्भ आणि अर्जुनाच्या मनस्थितीचा विचार करून एक वेगळा निष्कर्ष गाठला. त्यांच्या मते, गीता ही कर्मत्यागाचा नव्हे, तर कर्तव्यकर्माचा उपदेश करणारी आहे. या प्रश्नाने त्यांच्या आयुष्यभराच्या चिंतनाला दिशा दिली आणि पुढे मंडालेच्या तुरुंगात असताना या चिंतनाचे रूपांतर 'गीता रहस्य'मध्ये झाले. तुरुंगातील कठीण परिस्थितीत हा ग्रंथ लिहिणे ही केवळ बौद्धिक कामगिरी नव्हती, तर मानसिक आणि आध्यात्मिक सामर्थ्याची कसोटी होती. एकांतवास, मर्यादित साधने, संदर्भग्रंथांची अनुपलब्धता आणि शारीरिक-मानसिक त्रास या सगळ्या अडचणी असूनही टिळकांनी स्मरणशक्ती, अभ्यास आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हा ग्रंथ पूर्ण केला. अनेकांना तुरुंगवास नैराश्य देतो; परंतु टिळकांनी त्याच काळाला सर्जनाचे साधन बनवले. त्यामुळे 'गीता रहस्य' ही केवळ एक तात्त्विक मांडणी नसून त्यांच्या जीवन दृष्टिकोनाची साक्ष देणारी कृती ठरते. या ग्रंथाचा मुख्य संदेश जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल घडवून आणणारा आहे.

टिळकांनी गीतेचा केंद्रबिंदू म्हणून कर्मयोग मांडला; परंतु तो एकांगी स्वरूपात नव्हता. त्यांच्या मते, ज्ञान, कर्म आणि भक्ती हे तीनही योग एकमेकांशी घट्ट जोडले आहेत. त्यांचा समन्वय साधल्याशिवाय जीवनाचे खरे सार समजत नाही. ज्ञानाशिवाय केलेले कर्म दिशाहीन ठरते, तर भक्तीशिवाय ज्ञान कोरडे आणि निर्जीव बनते. त्याचप्रमाणे कर्माशिवाय ज्ञान आणि भक्ती यांना प्रत्यक्ष जीवनात अर्थ राहत नाही. म्हणूनच टिळकांनी या तिन्ही योगांचा एकात्मिक विचार मांडला आणि त्यातूनच परिपूर्ण जीवनमार्ग उभा राहतो, असे स्पष्ट केले. टिळकांच्या या विचाराचा समाजावर मोठा परिणाम झाला. भारतीय समाजावर दीर्घकाळ निवृत्तिमार्गाचा प्रभाव राहिल्यामुळे निष्क्रियता, संसारत्याग आणि कर्मापासून दूर राहण्याची वृत्ती वाढीस लागली होती. टिळकांनी या मानसिकतेला धक्का देत कर्मप्रधान जीवनाची संकल्पना पुढे आणली. त्यांनी सांगितले की, समाजाच्या उभारणीसाठी आणि राष्ट्रनिर्मितीसाठी प्रत्येक व्यक्तीने आपल्या कर्तव्याचे पालन करणे आवश्यक आहे. या विचारामुळे स्वातंत्र्यलढ्यातील कार्यकर्त्यांना नवी प्रेरणा मिळाली. देशासाठी केलेले कार्य हाच खरे कर्मयोग आहे, अशी भावना समाजात दृढ झाली. त्यामुळे 'गीता रहस्य' हा ग्रंथ केवळ आध्यात्मिक न राहता तो राष्ट्रवादाचा आणि सामाजिक जागृतीचा आधार बनला. टिळकांनी नैतिकतेचा एक व्यापक दृष्टिकोन मांडला. त्यांच्या मते, व्यक्तीच्या आचरणात शुद्ध बुद्धी, शुद्ध इच्छा आणि शुद्ध आचरण यांचा समावेश असला पाहिजे. अशा व्यक्तीच समाजाचे नेतृत्व करू शकतात आणि समाजाला योग्य दिशा देऊ शकतात.

'गीता रहस्य'मधील तत्त्वज्ञान केवळ वैयक्तिक मोक्षासाठी मर्यादित राहत नाही, तर समाजधारणेचा पाया ठरते. व्यक्ती आणि समाज यांच्यातील नाते अधिक सुदृढ करण्यासाठी हा ग्रंथ महत्त्वाची भूमिका बजावतो. आजच्या काळातही या ग्रंथाचे महत्त्व तितकेच आहे. आधुनिक जीवनातील ताणतणाव, स्पर्धा आणि नैतिक द्वंद्व यामुळे माणूस अनेकदा गोंधळून जातो. अशा वेळी 'गीता रहस्य' आपल्याला कर्तव्य पार पाडताना फलाची अपेक्षा न ठेवण्याचा, विवेकाने निर्णय घेण्याचा आणि श्रद्धेने जीवन जगण्याचा मार्ग दाखवते. त्यामुळे या ग्रंथाकडे केवळ आध्यात्मिक ग्रंथ म्हणून न पाहता जीवन व्यवस्थापनाचा एक शाश्वत मार्गदर्शक म्हणून स्वीकारणे आवश्यक आहे. त्यांनी भारतीय समाजाला निष्क्रियतेतून क्रियाशीलतेकडे नेण्याचा प्रयत्न केला. ज्ञान, कर्म आणि भक्ती यांच्या समन्वयातून त्यांनी जीवनाचा एक संतुलित आणि सशक्त मार्ग दाखवला. हा संदेश आजही तितकाच जिवंत आणि प्रेरणादायी आहे. व्यक्तीच्या उन्नतीपासून समाजाच्या प्रगतीपर्यंत आणि राष्ट्रनिर्मितीपासून आत्मिक समाधानापर्यंत सर्वत्र या ग्रंथाचा प्रभाव जाणवतो. भारतीय तत्त्वज्ञानाच्या अखंड परंपरेत भगवद्‌गीता हा ग्रंथ अत्यंत मध्यवर्ती स्थान राखतो. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन करणारा हा ग्रंथ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला असला, तरी गीता ही निवृत्तीनंतर अभ्यासावी, अशी समजूत दृढ झाली. ती केवळ चुकीची नाही तर धोकादायकही आहे. कारण गीता हा जीवन कसे जगावे, कर्तव्य कसे पार पाडावे, नैतिकतेचा मार्ग कसा स्वीकारावा याचे मार्गदर्शन करणारा ग्रंथ आहे. त्यामुळे ती तरुण वयातच आत्मसात करणे अधिक आवश्यक ठरते.

'गीता रहस्य' हा केवळ ग्रंथ नसून जीवन जगण्याची दिशा देणारा दीपस्तंभ आहे. टिळकांनी मांडलेला ज्ञान-कर्म-भक्ती यांचा समन्वय आजही तितकाच प्रभावी आणि आवश्यक आहे. त्यांच्या विचारांचा स्वीकार केल्यास व्यक्ती घडेल, समाज उभा राहील आणि राष्ट्र अधिक सक्षम बनेल. त्यामुळे गीतेचा अभ्यास केवळ वाचनापुरता मर्यादित न ठेवता आचरणात उतरवणे हीच खरी काळाची गरज आहे.

**प्रा. मुक्ता पुरंदरे**

## युद्ध : सत्तेचा माज की हव्यास

सध्या सुरू असलेले अमेरिका, इस्रायल, इराण युद्ध म्हणजे मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी आणि मानव जातीच्या नाशासाठी उचललेले अविचारी पाऊल आहे. राजकारणात प्रत्येकाला सत्ता हवी असते. मग ते राजकारण गावातील असो की राष्ट्राचे असो, त्या सत्तेचा स्वतःच्या स्वार्थासाठी, महत्त्वाकांक्षेसाठी आणि अहंकारासाठी उपयोग केला जातो. ज्या जनतेच्या जीवावर हे नेते सत्तेत येतात त्यांचा विचार यात गौण असतो. अहंकार, ईर्ष्या आणि हव्यास या तीन मानवी दोषांची एकत्रित परिणती म्हणजे आताचे युद्ध. अमेरिका एक प्रगत देश आहे. जगात त्याचा दबदबा आहे. तरीसुद्धा अमेरिकेला पूर्ण जग आपल्याच आधिपत्याखाली असावे असे वाटते. काही शतकांपूर्वी ब्रिटननेही हेच केले होते. आज स्थिती काय आहे? अमेरिकेच्या युद्धाची आणखी एक खुमखुमी म्हणजे आखातातील तेलावर आधिपत्य. म्हणजे माझं ते माझं आणि तुझं तेही माझंच, ही वृत्ती किती भयानक आहे. कदाचित अमेरिकेतील एपिस्टिन फाईलवरून लक्ष हटविण्यासाठी सुद्धा हे आक्रमण असू शकते. इस्रायल हा इराणचा प्रचंड द्वेष करतो. त्याला पूर्ण इराणच नष्ट करायचा आहे. त्यासाठी अमेरिकेला त्याने उचकावले. इराण काही धुतल्या तांदळासारखा नाही, पण त्याला स्वतःचे रक्षण करण्याचा पूर्ण अधिकार आहे. आक्रमण करणारे दोन्ही देश अन्वस्त्रधारी आहेत. पण इराणने अणुबॉम्ब बनवू नये म्हणून आक्रमण करतात हेच मुळी आश्चर्य आहे. सुरुवातीला या युद्धाचे गांभीर्य कोणालाच नव्हते. पण जसजसे युद्ध लांबू लागले तसे त्याचे गांभीर्य वाढले आणि काळजी वाटू लागली. आखाती देशात बरेच भारतीय नागरिक नोकरीनिमित्त आणि मुले शिक्षणासाठी आहेत. इराण सतत अमेरिकेच्या बेस कॅम्पवर हल्ला करायला लागला तस तशी भारतीयांची काळजी वाढायला लागली. चार-पाच दिवसात युद्ध संपेल असे सर्व जण मानत होते. पण युद्ध सुरू करणे आपल्या हातात आहे, ते थांबवणे नाही. दहा दिवसानंतर युद्धाच्या झळा भारतात पोहोचल्या तसे सर्व चिंतित झाले आणि पुढच्या दहा दिवसांनी त्याचे चटके बसायला लागले.

या युद्धात पाकिस्तान मध्यस्थी करणार हे ऐकून हसावे की रडावे हेच कळले नाही. परंतु एक मात्र खरे की या परिस्थितीचा फायदा उचलून पाकिस्तान भारताविरोधात नक्की काहीतरी आगळिक करू शकतो. त्यासाठी सर्वांनी सावध राहणे गरजेचे आहे. युद्धबंदी झाली तरी जिंकणारा लवकर विसरतो. पण हरणारा कधीही आपला पराभव विसरत नाही. त्याची जखम कायम भळभळत राहते. हे युद्ध लवकर थांबावे हीच ईश्वरचरणी प्रार्थना करूया. हे युद्ध लवकर संपले नाही तर आज सिलेंडर, पेट्रोलच्या रांगा लागल्या, उद्या बँकेत आणि एटीएमसमोर रांगा लागतील. पुन्हा कोरोना काळासारखे येरे माझ्या मागल्या, असे होईल.

**माधवी पत्की**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# पंच परिवर्तनाच्या मार्गाने चालत एक महान भारत घडवूया - ॲड.दत्तप्रसाद रांदड

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** आजच्या बदलत्या जीवनामध्ये व हिंदूंच्या सामाजिक उत्थानासाठी हिंदूंचे ऐक्य हे अत्यंत महत्त्वाचे आहे. हिंदूंनी आपले ऐक्य व सलोखा कायम जोपासून राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी कायम तत्पर असले पाहिजे, तसेच पंच परिवर्तनाच्या मार्गाने चालत एक महान भारत घडवूया असे विचार ॲड.दत्तप्रसाद रांदड यांनी व्यक्त केले. रामनवमी निमित्त जागृती हनुमान मंदिर एल.आय.सी.कॉलनी, नागझरी परिसर, अंबाजोगाई येथे सकल हिंदू समाजाच्या पुढाकाराने हिंदू संमेलन आयोजित करण्यात आले होते, या प्रसंगी ते बोलत होते.

या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी म्हणून मधुकर आजले (नायब तहसीलदार, अंबाजोगाई) तर प्रमुख पाहुणे म्हणून संजय कुलकर्णी (आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रमुख मार्गदर्शक) आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना ॲड.दत्तप्रसाद रांदड म्हणाले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हे शताब्दी वर्ष आहे. त्यानिमित्ताने या संघटनेचे कार्य व महत्त्व प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहचावे या उद्देशाने हिंदू संमेलन प्रत्येक गावामध्ये वस्त्यांमध्ये नगरांमध्ये आयोजित करण्याचा संकल्प केलेला आहे. त्याचाच एक भाग म्हणून हे आजचे हे हिंदू संमेलन सकल हिंदू समाजाच्या पुढाकाराने आयोजित केले आहे हे अभिनंदनीय आहे. उपस्थित सर्व रामभक्त बांधव आणि भगिनींनो आज आपण येथे केवळ रामनवमी साजरी करण्यासाठीच जमलो नाही. तर आपण जमलो आहोत रामाच्या आदर्शांना आपल्या जीवनात उतरविण्यासाठी. श्रीराम कोण आहेत ? श्रीराम म्हणजे आदर्श आहे. श्रीराम म्हणजे मर्यादा आहे. श्रीराम म्हणजे कर्तव्य आहे आणि म्हणूनच रामराज्य ही केवळ कल्पना नाही. तर ती आपली जबाबदारी आहे.




आजचे वास्तव पहाता समाजात काय दिसतेय ? आज विखुरलेला समाज, कमी होत चाललेले संस्कार, वाढत चाललेला स्वार्थ आणि कमी होत चाललेली एकता. म्हणूनच हिंदू संमेलन ही आजची सर्वांत मोठी सामाजिक गरज आहे. मित्रांनो, गेल्या १०० वर्षांपासून एक विचार शांतपणे काम करीत आहे. तो विचार व्यक्ती घडवतो. समाज जोडतो. राष्ट्रभक्ती निर्माण करतो. संघाची स्थापना १९२५ मध्ये पूजनीय डॉ.हेडगेवार यांनी असंघटित हिंदू समाजाला हिंदुत्वाच्या आधारावर संघटित करण्याच्या विचाराने केली. याची १०० वर्षांपासूनची अविरत साधना आहे.

आज आपण या शताब्दी वर्षांत उभे आहोत. शताब्दी वर्ष हा केवळ उत्सव नाही. तर हा संकल्पाचा क्षण आहे. पंच परिवर्तन-समाज परिवर्तनाच्या जन जागरण व बदलासाठी विशेष प्रयत्न करण्यासाठी संघाने आपल्याला एक दिशा दिली आहे. त्यानुसार पंच परिवर्तन म्हणजे स्व-परिवर्तन म्हणजे स्वतः बदला. शिस्त, प्रामाणिकपणा, राष्ट्रभक्ती अंगीकारा. कुटुंब प्रबोधन म्हणजे घरात संस्कार द्या. मोबाईल नाही. संवाद वाढवा. सामाजिक समरसता म्हणजे जात-पात विसरा. आपण सर्व हिंदू आहोत ही भावना जपा. पर्यावरण संरक्षण म्हणजे वृक्ष लावा, निसर्ग वाचवा. आणि स्वदेशी आणि समाज कर्तव्य म्हणजे स्वदेशी वापरा, समाजासाठी जगा याकरिता मित्रांनो, हिंदू संमेलन ही सकल हिंदू समाजाने हिंदूंच्या एकत्रीकरणाच्या परिवर्तनाची केलेली सुरूवात आहे. आज आपण रामनवमीच्या शुभ मुहूर्तावर बीज पेरतो आहोत. उद्या त्याचा वटवृक्ष तयार करायचा आहे. पण, तो आपोआप होणार नाही. त्यासाठी सातत्य हवे. त्यासाठी कृती हवी. त्यासाठी समर्पण हवे. यासाठी हवी ठोस कृती. आज इथून जाताना आपण ठरवूया साप्ताहिक सामूहिक आरती, दर आठवड्याला एकत्र या, रामनवमी, हनुमान जयंती, शिवजयंती, सण-उत्सव सामूहिक साजरे करा. समाजसेवा, रक्तदान, स्वच्छता, गरजूंना मदत करा. हिंदू संमेलनाच्या माध्यमातून मी युवकांना आवाहन करतो की, युवकांनो आता वेळ आली आहे. मोबाईल सोडा, मैदानात या, समाजात उतरा, नेतृत्व घ्या. युवक जागा झाला, तर रामराज्य थांबवणारा कोणी नाही. हिंदू एकता हीच अंतिम शक्ती आहे. आपण विभागलो तर आपण कमजोर होवूत. जर आपण एकत्र आलो तर आपण अजेय ठरू, तेव्हा जात नाही. पंथ नाही. भाषा नाही.

आपण फक्त हिंदू आहोत. असे सांगून यावेळी मी बदलणार, मी समाजासाठी काम करणार, मी हिंदू एकतेसाठी उभा राहणार, मी रामराज्य निर्माण करण्यासाठी कार्य करणार असा अंतिम संकल्प करण्यात आला. व रामराज्य कुठून येणार नाही. तर ते आपणच घडवणार आहोत. चला तर मग रामाच्या आदर्शाने जगूया, हनुमानाच्या शक्तीने काम करूया, आणि संघाच्या विचारांनी प्रेरित होऊन पंच परिवर्तनाच्या मार्गाने चालत एक महान भारत घडवूया असे आवाहन ॲड.दत्तप्रसाद रांदड यांनी केले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना संजय कुलकर्णी म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या युगामध्ये मानसिक शांतता राखण्यासाठी आपण ध्यान धारणा केली पाहिजे. मन स्थीर व शांत असेल तरच खऱ्या अर्थाने आपण सुखी व समाधानी राहू त्यासाठी सुदर्शन क्रिया महत्त्वाची आहे. आरोग्य चांगले असेल तरच खऱ्या अर्थाने आपण हिंदू म्हणून एक संघ राहू शकू असे कुलकर्णी म्हणाले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी मधुकर आजले यांनी हिंदू संमेलनाचे महत्त्व अत्यंत मौलिक शब्दांमध्ये व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रल्हाद तावरे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सेवानिवृत्त प्राचार्य गोविंद आगळे यांनी मानले. या कार्यक्रमास परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा.डॉ.बाळू कागदे, प्रा.डॉ.विलास नरवडे, प्रा.डॉ.वसंत गायकवाड, प्रा. डॉ.नितीन केंद्रे, अनंत मलवाड, सोनवणे सर, सतीश ठाकूर, मयूर कुलकर्णी आणि भगवान बाबा भजनी मंडळ, नागझरी परिसर अंबाजोगाई यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## पंकजाताई मुंडे समाजरत्न पुरस्काराने सन्मानित

तभा. वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी ) |** श्री संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान येथे दि १ मार्च २०२६ रविवार रोजी १८ वा राज्यस्तरीय वंजारी वधु वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांतर्गत प्रथम सत्रात विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्य केलेल्या गुणवंतांचा राज्यस्तरीय मातृभूमी रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सदरील कार्यक्रमास पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले होते. परंतु काही कारणास्तव त्या या कार्यक्रमास उपस्थित राहू शकल्या नाहीत. पंकजाताई मुंडे दि. २६ मार्च २०२६ गुरुवार रोजी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर



आल्या होत्या. दि. २६ मार्च रोजी बीड शहरांमध्ये विविध कार्यक्रमा निमित्त पंकजाताई मुंडे आल्या असता, त्यांचा गोल्डन चॉइस हॉटेल प्रांगणात मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी सन्मानपत्र देऊन राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्काराने त्यांचा सन्मान करण्यात आला यावेळी लक्ष्मण चाटे,पांडुरंग जायभाये, डॉ. लक्ष्मण पवळ आदींची उपस्थिती होती.

## रुग्णसेवा अधिक सक्षम करण्यासाठी पंकजा मुंडे यांचा 'स्वाराती' त आढावा · सुविधा वाढीसाठी दिल्या सूचना

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामकाजाचा आढावा शनिवारी पंकजा मुंडे यांनी घेतला. ग्रामीण भागातील रुग्णांसाठी जीवनवाहिनी ठरणारे हे रुग्णालय पूर्ण क्षमतेने आणि अधिक सक्षमपणे कार्यरत राहावे, यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे मत पंकजा मुंडे यांनी व्यक्त केले.

रुग्णालयातील सोयी – सुविधांमध्ये वाढ करण्यावर विशेष भर देत त्यांनी प्रशासनाला आवश्यक त्या सूचना दिल्या. मनुष्यबळाची कमतरता, रिक्त पदांची भरती,



कर्करोग उपचार केंद्राची उभारणी यासह रुग्णालय परिसरातील स्वच्छता, वृक्षारोपण, सोलर प्रकल्प आणि घनकचरा व्यवस्थापन या बाबींवर लक्ष केंद्रित करण्याचे निर्देश देण्यात आले.

तसेच, रुग्णालयात आवश्यक मनुष्यबळ, औषध पुरवठा आणि अत्याधुनिक वैद्यकीय यंत्रसामग्री उपलब्धतेबाबत संबंधित विभागांकडून सविस्तर माहिती घेण्यात आली. या सर्व बाबींची पूर्तता करण्यासाठी मंत्रालयीन स्तरावर विभागनिहाय बैठका घेऊन कार्यवाही करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

रुग्णालयाच्या सुरू असलेल्या तसेच नव्याने हाती घेण्यात आलेल्या बांधकाम कामांना निधीअभावी अडथळा येऊ नये, यासाठीही आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे पंकजा मुंडे यांनी यावेळी सांगितले. यावेळी युवानेते अक्षय मुंदडा, अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

## रामनवमी उत्सव व ध्रुव गटातील विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

तभा. वृत्तसेवा

**बीड |** रामनवमीनिमित्त शाळा अंतर्गत रामरक्षा स्तोत्र स्पर्धा घेण्यात आली. तसेच सर्व विद्यार्थ्यांचे सामूहिक पठण घेण्यात आले. स्पर्धेसाठी जन शिक्षण संस्थांनमधील कॉम्प्युटर ऑपरेटर सुमेधाताई मनसबदार या परीक्षक म्हणून लाभल्या होत्या. अनिल डोंगरे सर यांनी रामनवमीनिमित्त विद्यार्थ्यांना खाऊ दिला. तसेच ध्रुव गटातील विद्यार्थी यांची परीक्षा झाली . २८ एप्रिल रोजी त्यांचा गटातील शेवटचा दिवस उत्साहात साजरा केला गेला. ॲड.सौ. अर्चनाताई तुंगार व श्रीमती सुनंदाताई कुलकर्णी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अर्चनाताई मोराळे गटप्रमुख सौ. आरतीताई जोशी कार्यक्रमासाठी तसेच विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध कला गुण सादर केले ,गाणे ,शिक्षकांच्या हुबेहूब कृती, आणि मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांना या कार्यक्रमातून खूप आनंद मिळाला. त्यांच्या चेहऱ्यावर तो जाणवत होता. इयत्ता पहिलीत जाण्यासाठी ते उत्सुक दिसत होते. अर्चनाताई यांनी विद्यार्थ्यांना गोष्टीमधून शांततेचा संदेश दिला. तसेच सुनंदाताईंनी शिस्त, तसेच आत्मसात केलेल्या गोष्टीचें विस्मरण होता कामा नये हे विद्यार्थ्यांना पटवून दिले. ध्रुव गटातील सौ. स्वातीताई देशपांडे व सौ.मधुराताई गुळवेलकर यांनी या कार्यक्रमासाठी विशेष श्रम घेतले. शाळेतर्फे ध्रुव गटातील विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. सर्व शिक्षक वृंदां च्या मदतीने हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

## मातृत्वाच्या भावनेतून मी तुमची सेवक म्हणून काम करतेय ; सर्व सामान्य, गोरगरीबांची कामे करताना कायम पाठिशी राहील

### ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते अंबाजोगाईत जनसंपर्क कार्यालयाचे थाटात उदघाटन

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** बीड हा माझा जिल्हा आहे. या जिल्ह्यावर माझे विशेष प्रेम आहे. 'आईची माया दाईला येत नसते' या पद्धतीने या जिल्ह्याच्या विकासासाठी आपली सदैव तळमळ राहिली आहे आणि राहणार आहे. मी तुमची सेवक म्हणून काम करणार आहे, यात मातृत्वाची भावना देखील आहे. मंत्री असताना मी यापूर्वीही अंबाजोगाईत जनतेच्या कामांसाठी कार्यालय सुरू केले होते.त्याच प्रथेला अनुसरून आज अंबाजोगाई येथे संपर्क कार्यालय सुरू केले आहे. हे कार्यालय



सर्वसामान्य जनतेला विनासायास व विनाकष्ट जिथल्या तिथे त्यांची कामे होण्यासाठी कार्यरत राहील अशी ग्वाही राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज येथे दिली.

शहरातील प्रशांत नगर येथे सुरू करण्यात आलेल्या जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज झाले त्यावेळी जिल्हाभरातून आलेल्या कार्यकर्त्यांसमोर त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, गेवराईच्या नगराध्यक्षा गीता भाभी पवार ,युवा नेते अक्षय मुंदडा, बालासाहेब दोडतले, संतोष हंगे, सलीम जहांगीर, आदित्य सारडा, युद्धजित पंडित, माधव निर्मळ, गणेश कराड आदींसह भाजपाचे जिल्ह्यातील सर्व प्रमुख पदाधिकारी,मान्यवर कार्यकर्ते उपस्थित होते.

## 35 वर्षांपासून फरार दरोडेखोर अटकेत

**बीड |** बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने ३५ वर्षांपासून फरार असलेल्या एका सराईत दरोडेखोराला अटक करून मोठी कामगिरी केली आहे. केज पोलीस ठाण्यात १९९१ मध्ये नोंदवलेल्या दरोड्याच्या गुन्ह्यातील आरोपी हा तेव्हापासून पोलिसांना गुंगारा देत होता. जिल्ह्याभरात राबवल्या जाणाऱ्या फरार आरोपी शोध मोहिमेदरम्यान, पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांच्या पथकाला हा आरोपी कोरेगाव येथील आपल्या घरी आल्याची गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने सापळा रचून आरोपीला शिताफीने ताब्यात घेतले.

## बामुक्ता च्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी डॉ.ज्ञानेश्वर शिंदे यांची बिनविरोध निवड

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव प्रतिनिधी |** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ टीचर असोसिएशन संघटनेच्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव येथील लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर शिंदे यांची बिनविरोध निवड झाली. अध्यक्षपदी डॉ. अर्जुन मोरे तर सचिवपदी डॉ. शंकर वाघमारे यांची निवड करण्यात आली ही माहिती बामुक्ताचे विभागीय अध्यक्ष डॉ.राजेश करपे यांनी दिली. माजी व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. फुलचंद सलामपुरे यांच्या अध्यक्षतेखाली बलभीम महाविद्यालय बीड येथे पदाधिकाऱ्यांची बैठक झाली या बैठकीत बीड जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यात आली



कोषाध्यक्षपदी डॉ. संजय सुरवसे यांची निवड झाली तर उपाध्यक्षपदी डॉ. ज्ञानेश्वर शिंदे, डॉ.विलास भिलारे, डॉ.राजकुमार थोरवे यांची निवड करण्यात आली सहसचिवपदी डॉ. सुनील जाधव ,डॉ. हरिभाऊ कदम यांची निवड झाली . केंद्रीय कार्यकारणीत बीड जिल्हा प्रतिनिधी म्हणून डॉ. सतीश कदम, डॉ. खामकर सुचिता ,डॉ. रफिक शेख यांची निवड झाली. बीड जिल्हा कार्यकारणी मध्ये तालुका प्रतिनिधी म्हणून डॉ. राजकुमार चाटे, डॉ. सखाराम पांढरे ,डॉ. रमेश माने, डॉ.कलंदर पठाण,डॉ. गजानन दराडे, डॉ.ज्ञानेश्वर येवले ,डॉ. सीताराम इंगोले,डॉ. सचिन किस्ती यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या बैठकीस डॉ. विलास खंदारे, डॉ.अंकुश कदम, डॉ. आप्पासाहेब हुंबे,प्राचार्य डॉ. संतोष उंद्रे, डॉ. प्रशांत कुमार वनजे, डॉ. मुंजाभाऊ धोंडगे,डॉ. बालासाहेब बोडके, डॉ.नितीन ढवळे, डॉ. बिलास काळे उपस्थित होते. या निवडीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## ज्ञानोबाराव देशमुख विडेकर यांचे निधन

तभा. वृत्तसेवा

**बीड, दि. २८ (प्रतिनिधी) |** जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष ज्ञानोबाराव सोनेराव देशमुख - विडेकर यांचे शुक्रवारी (दि. २७) रात्री साडे आठ वाजता वृद्धापकाळाने बीड येथील निवासस्थानी निधन झाले. त्यांच्यावर शनिवारी (दि. २८) विडा (ता. केज) येथील त्यांच्या मुळ गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी श्रीराम महाराज विडेकर, माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, माजी आमदार राजेंद्र जगताप, माजी आमदार सुनिल धांडे, माजी आमदार पृथवीराज साठे, ऋषीकेश आडसकर, रणवीर पंडित, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष अशोकराव देशमुख, अंबा कारखान्याचे माजी अध्यक्ष राजेसाहेब देशमुख, माजी सभापती राजेसाहेब देशमुख, प्रा. सुशिला मोराळे, डॉ. विक्रम सारुक, विजयकांत मुंडे, दत्तात्रय ठोंबरे, दादासाहेब मुंडे आदींसह विविध घटकांतील नागरिकांची उपस्थिती होती.



जेष्ठ नेते शरद पवार यांचे कट्टर समर्थक असलेले ज्ञानोबाराव विडेकर १९८० ते २००० या काळात शिवाजीराव पंडित, दिवंगत केशरबाई क्षीरसागर, दिवंगत बाबूराव आडसकर, दिवंगत भगवानराव लोमटे यांचे समकालीन राजकीय नेते होते. त्यांनी विडा व नांदूरघाट जिल्हा परिषद गटातून जिल्हा परिषदेचे प्रतिनिधीत्व तसेच जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून काम केले. विडा ग्रामपंचायत, सेवा सहकारी सोसायटीवरही त्यांचे ३० वर्षे प्रभूत्व होते. त्यांच्या माध्यमातून विडा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र, ३३ केव्हीए उपकेंद्रांची उभारणी झाली. ज्ञानोबाराव विडेकर एस. कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष असताना पक्षाचे त्यावेळी जिल्ह्यातून सातही आमदार विजयी झाले होते. इडा शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी शाळाही उघडली.

## बीड आस्तिक :आद्य शंकराचार्यांचा सनातन धर्माचा उपदेश घरोघरी अभ्यासला जावा : श्री श्री शंकर भारती महास्वामी

**बीड (प्रतिनिधी) |** या पुरातन चंपावती नगरीत शंकराचार्यांचा चातुर्मास देखील झालेला आहे. क्षेत्र तुळजापूर, पैठण, परळी वैजनाथ,नवगन राजुरी यासह बीड शहरातील जटाशंकर, कंकालेश्वर, खंडेश्वरी अशा विविध क्षेत्रात आद्य शंकराचार्य चा प्रवास वास्तव्य झालेल्या ठिकाणं. शहरातील राम मंदिरात सीताराम



आणि हनुमंत स्थापित झालेल्या आहेत. बीड हे अस्तिक शहर आहे. फारसा परिचय नसताना मोठ्या सहकार्य यातून रामोत्सव अविस्मरणीय झाला, असे कौतुक रुपी आशीर्वाद बिडकर यांना देत आद्यशांकराचार्याचा सनातन धर्मासाठीचा उपदेश घरोघरी अभ्यासला जावा असे मार्गदर्शन श्री श्री शंकर भारती महास्वामी यांनी आपल्या आशीर्वाचनातून बीडकरांना केले.

बीडच्या इतिहासात नोंद घ्यावी लागेल आसा "राम उत्सव" नऊ दिवस बीड येथील रविराज मंगल कार्यालयात संपन्न झाला. बीडच्या इतिहासात नोंद नसलेले येथील क्षेत्र महात्म्य महास्वामिनी या प्रवासात अधोरेखित केले.

नूतन वर्षातील पराभवनाम संवत्सरात सुरू झालेला बीडचा रामोत्सव खऱ्या अर्थाने उत्सव म्हणून बीडकरांनी केला. विविध कार्यक्रमाचा दुराग्रह न ठेवता मौन रूपात सहकार्य केले, याबद्दल महास्वामिनी समाधान व्यक्त केले. मोठ्या शहरातून रामोत्सवाचा आग्रह आणि तयारीचा प्रस्ताव होता पण प्रभू श्रीराम आणि आद्य शंकराचार्यांच्या स्पर्शाने या पावन भूमीत हा रामोत्सव संपन्न व्हावा अशी इच्छा होती.

## महावितरणने नियमितपणे ग्राहकांना बिले द्यावीत ; अन्यथा अंबाजोगाईकर वीज बिले भरणार नाहीत : डॉ.राजेश इंगोले

**अंबाजोगाई |** महावितरण द्वारे अंबाजोगाई मध्ये विद्युत ग्राहकांकडून सक्तीने विज बिल वसुली सुरू आहे. वीज बिले न भरल्यास विद्युत ग्राहकांचे वीज कनेक्शन बंद करून त्यांना अंधारात ठेवण्यात येत आहे. वरवर पहाता ही कृती जरी नियमात बसणारी वाटत असली तरी सुद्धा अंबाजोगाई मध्ये ७० टक्के विद्युत ग्राहकांना नियमित बिले मिळत नसल्याची तक्रार प्राप्त झाली आहे. त्यामुळे महावितरणने नियमितपणे ग्राहकांना बिले द्यावीत ; अन्यथा अंबाजोगाईकर वीज बिले भरणार नाहीत असा इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (अजित पवार गट) चे नेते डॉ.राजेश इंगोले यांनी दिला आहे.

या संदर्भात जनतेला जाहीर आवाहन करताना व आमच्या प्रतिनिधीशी बोलताना राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (अजित पवार गट) चे नेते डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले आहे की, महावितरणची ही विद्युत बिले देण्याबाबतची अनियमितता ही बेकायदेशीर व नियमबाह्य आहे. त्यामुळे वाढीव बिलांवरील सक्तीची वसुली ही चुकीची आहे. विद्युत ग्राहकांना वीज बिले प्रत्येकमहिन्याच्या महिन्याला न दिल्यामुळे एकदाच चार ते पाच महिन्यांची बिले देण्यात आली आहेत. कुणाकुणाला तर तब्बल एक-एक वर्षाची बिले देण्यात आलेली आहेत. त्यामुळे सदरील वीज वापराचे युनिट्स अनेक पटीने वाढवून त्या युनिट वापराच्या हिशोबाने वाढीव दराने वीज बिल ग्राहकांच्या माथी मारण्यात आले आहेत. असे अनेक प्रकार



अंबाजोगाई मध्ये घडले आहेत. या सर्व प्रकरणांची रितसर चौकशी करून वाढीव विद्युत बिले आलेल्या ग्राहकांना ही बिले तात्काळ कमी करून त्यांना योग्य ती बिले द्यावी अन्यथा महावितरण विज मंडळाच्या विरूद्ध विद्युत ग्राहकांचे आंदोलन उभारण्यात येईल असा इशारा अंबाजोगाईचे सामाजिक कार्यकर्ते तथा माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांनी महावितरणला दिलेल्या निवेदनात देण्यात आला आहे.

नियमितपणे विद्युत बिले देणे हे महावितरणचे कर्तव्य आहे व वीज ग्राहकांचा अधिकार देखील आहे. महावितरणच्या बिल दिरंगाईमुळे अनेक विद्युत ग्राहकांना नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, तसेच वीज पुरवठा खंडित केल्यामुळे नाहक मनस्ताप होत आहे. त्यामुळे महावितरणच्या मुख्यअभियंत्यांनी या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे असे मत डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले. महावितरणच्या मुख्य अभियंत्यांनी तात्काळ या प्रकरणी तातडीची बैठक बोलावून यावर आवश्यक ती कार्यवाही करणे ग्राहकांचे हित जोपासण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे.त्यामुळे त्यांनी विभागाची तातडीची बैठक बोलवावी अशी आग्रही भूमिका डॉ.इंगोले यांनी यावेळी घेतली. दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात इंगोले यांनी अंबाजोगाईतील अनेक मान्यवर प्रतिष्ठितांनी, दुकानदारांनी महावितरणच्या या भोंगळ कारभाराविषयी माझ्याकडे दूरध्वनी द्वारे तक्रारी केल्या आहेत. त्यापैकी अनेक तक्रारी मी वैयक्तिक पातळीवर वीज कर्मचाऱ्यांशी बोलून सोडविण्याचा प्रयत्न केला आहे.

परंतु, दिवसेंदिवस या तक्रारी वाढतच आहेत. त्यामुळे याप्रकरणी धोरणात्मक निर्णय महावितरण वीज मंडळाने घेणे आवश्यक असल्याचे मत डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी व्यक्त केले. येणाऱ्या काही दिवसात जर या प्रकरणांचा निपटारा महावितरण द्वारे झाला नाही तर याप्रकरणी ग्राहक मंचात तक्रार करण्यातच येईल. परंतु, विद्युत ग्राहकांचे एक जनआंदोलन उभा करण्यात येईल असा इशारा डॉ.राजेश इंगोले यांनी महावितरणला दिलेल्या निवेदनातून केला आहे.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## धाराशिव शहरात घरफोडी; ३ लाखांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ मार्च -**

धाराशिव शहर पोलीस ठाणे हद्दीत अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून दागिने व रोख रक्कम असा सुमारे ३ लाख १ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे.

याबाबत फिर्यादी प्रविण प्रल्हाद माने (वय ३७, रा. वडगाव सि., ता. जि. धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि.२७ मार्च रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने त्यांच्या घराचा कडी-कोंडा तोडून आत प्रवेश केला.



यावेळी घरातील ५ ग्रॅम सोन्याचे दागिने, सुमारे १७५ तोळे चांदीचे दागिने, १२ किलो पितळी भांडी तसेच ७० हजार रुपये रोख रक्कम असा एकूण ३,०१,००० रुपयांचा ऐवज चोरून नेण्यात आला.

या घटनेची माहिती मिळताच प्रविण माने यांनी दि. २८ मार्च रोजी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.



### संक्षिप्त वृत्त...



#### परंड्यात नूतन सभापतीपदी भाऊसाहेब खरसडे यांचा सत्कार

**परंडा, दि.२९ मार्च -** धाराशिव जिल्हा परिषद कृषी व पशुसंवर्धन सभापतीपदी भाऊसाहेब खरसडे यांची निवड करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर परंडा येथील भाजपा संपर्क कार्यालयात मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांनी खरसडे यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी भाजपा जिल्हा सरचिटणीस ॲड. गणेश खरसडे, दादासाहेब खरसडे, डॉ. दशरथ घोगरे, अंकुश मुळीक, होरे, नितीन गाढवे, प्रकाश दुरुंदे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.



#### महिला आरोग्य जागरूकतेसाठी अणदूरमध्ये कार्यशाळा

**अणदूर, दि.२९ मार्च -** येथील जवाहर महाविद्यालयात शांताकाकी आलूरे महिला सक्षमीकरण कक्ष व विशाखा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने चाळीशी अगोदर व नंतर महिला आरोग्य काळजी व जागरूकता या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यशाळेला महिला व विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्य मार्गदर्शक डॉ. वैष्णवी लंगडे यांनी अनियमित मासिक पाळी, प्री-मेनोपॉज व मेनोपॉजनंतरची काळजी, तसेच स्तन कॅन्सर प्रतिबंध याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी होते. नगरसेविका मीनाक्षी काळे, कल्पना गायकवाड, मिलन कासार व मीरा घुगे यांची उपस्थिती होती. प्रस्ताविक डॉ. मीना जाधव, सूत्रसंचालन डॉ. दीपा कलशेट्टी व आभार प्रदर्शन डॉ. ज्योती हत्तरगे यांनी केले.



#### नवोदय विद्यालयात भारत सरकारच्या केंद्रीय प्रमाण पत्रांचे वाटप

**तुळजापूर, दि.२९ मार्च -** भारत सरकारच्या केंद्रीय पंचायतराज व ग्रामविकास मंत्रालयातर्फे आयोजित मॉडेल युवा ग्रामसभा कार्यक्रमांतर्गत पीएम श्री नवोदय विद्यालय, तुळजापूर येथील विद्यार्थ्यांनी आदर्श बाल युवा संसद २०२५-२६ चे प्रभावी सादरीकरण करून उत्कृष्टता प्रमाणपत्र पटकावले. या यशासाठी सामाजिक विज्ञान विभागाचे चक्रपाणी गोमारे व परेश भाटिया यांनी मार्गदर्शन केले. दि. २८ मार्च रोजी प्रभारी प्राचार्य दत्तात्रय बडे व वरिष्ठ शिक्षक सी.सी. गोमारे यांच्या हस्ते प्रातःसभेत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी प्राचार्य बडे यांनी लोकशाही व्यवस्थेतील संसदेचे महत्त्व पटवून देत आदर्श नागरिकत्वाचे गुण आत्मसात करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजाता कराड यांनी केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे शिक्षक व कर्मचारी वर्गाकडून अभिनंदन करण्यात आले.

#### वाहनधारकांकडून ४.४३ लाखांचा दंड वसूल

**धाराशिव, दि.२९ मार्च -** शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांकडून दि. २८ मार्च रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर विशेष मोहीम राबवून मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण ४६६ प्रकरणे नोंदवून ४ लाख ४३ हजार ५०० रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

# घाटपिंपरी ग्रामपंचायतीत ४०.५५ लाखांचा अपहार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ मार्च -**

वाशी तालुक्यातील घाटपिंपरी ग्रामपंचायतीतील १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस आले असून, या प्रकरणी सरपंचासह तिघांविरोधात वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अश्विनी विनोद सातपुते (सरपंच, ग्रामपंचायत पाटपिंपरी), अनिल राजाराम तुपेरे (ग्रामपंचायत अधिकारी, घाटपिंपरी) आणि मनोज पवार (प्रो. रेवा एंटरप्रायझेस, उस्मानाबाद) यांनी संगनमत करून शासनाच्या १५ व्या वित्त आयोगातून मिळालेल्या निधीचा अपहार केल्याचा आरोप आहे. दि.६ मे २०२४ ते ४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत विविध कामांच्या नावाखाली एकूण ४० लाख ५५ हजार ८३ रुपयांची रक्कम अनियमितरीत्या वापरून स्वतःच्या फायद्यासाठी वळवण्यात आल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.




सरपंचासह तिघांवर गुन्हा...

या प्रकरणी पंचायत समिती वाशी येथील विस्तार अधिकारी विलास श्रीधरराव माचवे (वय ५३, रा. वाशी) यांनी दि. २८ मार्च २०२६ रोजी वाशी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२), ३१६(५) व ३(५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदर प्रकारामुळे ग्रामपंचायत प्रशासनातील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. निधीचा अपहार नेमक्या कोणत्या कामांच्या माध्यमातून करण्यात आला, याबाबत पोलीस अधिक तपास करत असून संबंधित कागदपत्रांची छाननी सुरू आहे.

दरम्यान, या प्रकरणातील आरोपींवर कडक कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. पुढील तपास वाशी पोलीस ठाण्याचे अधिकारी करत आहेत.

## श्रीराम नवमीनिमित्त उमरग्यात भाजपची शोभायात्रा; शहरात भक्तिमय वातावरण



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२९ मार्च -**

श्रीराम नवमीच्या पावन पर्वानिमित्त उमरगा शहरात भारतीय जनता पक्षाच्या वतीने गुरुवारी (दि.२६) सायंकाळी भव्य व आकर्षक शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. या शोभायात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत संपूर्ण शहरात भक्तिमय व उत्सवी वातावरण निर्माण झाले.

छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून शोभायात्रेची सुरुवात करून श्री राम मंदिरापर्यंत जल्लोषात मार्गक्रमण करण्यात आले. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आले.

भगवे फेटे परिधान करून रामभक्त मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते. जय श्रीरामच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. युवक-युवतींचा मोठा सहभाग शोभायात्रेचे वैशिष्ट्य ठरला.

भाजप युवा नेते मल्हार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व हर्षवर्धन चालुक्य यांच्या मार्गदर्शनाखाली ही शोभायात्रा पार पडली.

यावेळी माजी नगराध्यक्ष हंसराज गायकवाड यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री राम मंदिरात शोभायात्रेचा समारोप करण्यात आला.

## ट्रॅक्टर ट्रॉलीला दुचाकीची धडक; युवकाचा जागीच मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२९ मार्च -**

कळंब-लातूर मार्गावर लोहाटा पाटीजवळ झालेल्या भीषण अपघातात एका युवकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, समाधान मोहन डोंगरे (वय २६, रा. कोथळा ता. कळंब) हे दि.१ मार्च २०२६ रोजी रात्री ८.२५ वाजता मोटारसायकल (एमएच २५ बीजी ३६२९) वरून जात असताना नॅचरल कारखान्याच्या कार्यालयाजवळ उसाच्या दोन ट्रॉली (क्रमांक नसलेल्या) जोडलेल्या ट्रॅक्टरला मागून धडक दिली. अपघातात ते गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यू झाला.

याप्रकरणी शंकर मोहन माने (रा. कोथळा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भा.न्या.सं. कलम १०६(१), २८१, १२५(अ), १२५(ब) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## परंड्यात ज्वेलर्स दुकानातून ८० हजारांचे चांदीचे पैंजण चोरीस

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२९ मार्च -**

परंडा शहरातील बार्शी रोडवरील ज्वेलर्स दुकानातून अनोळखी चार महिलांनी चांदीचे पैंजण चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



याबाबत फिर्यादी हिरालाल जनार्धन पेडगावकर (वय ६६, रा. स्वाती समर्थ नगर, बार्शी रोड, परंडा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे 'समर्थ ज्वेलर्स खर्डेकर गोल्ड' या दुकानात दि.२६ मार्च २०२६ रोजी दुपारी सुमारे १२.४० वाजता चार अनोळखी महिला ग्राहकाच्या बहाण्याने आल्या. त्यांनी दुकानातील सुमारे ६०० ग्रॅम वजनाचे ७ जोड चांदीचे पैंजण, अंदाजे ८० हजार रुपये किंमतीचे, चोरून नेले.

या घटनेची माहिती मिळताच पेडगावकर यांनी दि.२७ मार्च रोजी परंडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## परंड्यात 'जय श्रीराम'च्या गजरात भव्य रॅलीचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२९ मार्च -**

परंडा शहरातील महाराणा प्रतापसिंह चौक येथे प्रभू श्रीरामांच्या चरणी वंदन करून भव्य धार्मिक रॅलीचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी मा.आ. सुजितसिंह ठाकूर, युवा नेते मल्हार पाटील तसेच जि.प. सदस्य धनंजय सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती.



या शुभक्षणी वातावरण जय श्रीरामच्या गजराने दुमदुमून गेले होते. श्रद्धा, संस्कृती आणि एकतेचा संगम असलेला हा सोहळा केवळ रॅलीचा प्रारंभ नसून भक्तीभावनेचा उत्सव ठरला. उपस्थित भाविकांच्या मनात श्रद्धेचा दिवा प्रज्वलित झाला. रॅलीचे मार्गक्रमण सुरू होताच पुष्पवृष्टी करून नागरिकांनी रॅलीचे स्वागत करत भक्तिमय वातावरण अधिकच भारावून टाकले.

यावेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस ॲड. गणेश खरसडे, जिल्हा उपाध्यक्ष ॲड. संतोष सूर्यवंशी, उपनगराध्यक्ष समरजीतसिंह ठाकूर, अरविंद रगडे, उमाकांत गोरे, गौतम लटके, जयदेव गोफणे, धनाजी गायकवाड, तानाजी पाटील, शैलाभाभी ठाकूर, ज्योती सावंत, प्रियंका क्षीरसागर, मोनिका पाटील, सुप्रिया रगडे, ज्योती भातलवंडे आदी मान्यवर पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला उपस्थित होत्या.

## जगाला युद्धाची नव्हे, बुद्धाची गरज : सुनील गायकवाड

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२९ मार्च -**

चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या जयंतीनिमित्त दि. २६ मार्च रोजी कळंब शहरात विचारप्रवर्तक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातील विरंगुळा सभागृहात हा कार्यक्रम पार पडला.



यावेळी सम्राट अशोक यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक बौद्धाचार्य सुनील गायकवाड यांनी कलिंग युद्धानंतर अशोकांच्या जीवनातील झालेल्या परिवर्तनावर प्रकाश टाकत, त्यांनी स्वीकारलेल्या अहिंसा, करुणा व समतेच्या मार्गाचे महत्त्व अधोरेखित केले. बुद्धांच्या धम्माच्या प्रसारासाठी त्यांनी केलेल्या कार्याची माहितीही त्यांनी दिली.

सध्याच्या जागतिक परिस्थितीत युद्धाऐवजी बुद्धांच्या विचारांची गरज असल्याचे सांगत, अहिंसा व मानवतेच्या मूल्यांवरच खऱ्या अर्थाने शांतता प्रस्थापित होऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास सुमित रणदिवे, शिवाजी शिरसाट, राजाभाऊ गायकवाड, मुकेश गायकवाड यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हेडकॉन्स्टेबलपदी वाघमारेची निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ मार्च -**

तालुक्यातील काक्रंबा येथील अविनाश अरविंद वाघमारे या २० वर्षीय तरुणाने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत पोलीस हेडकॉन्स्टेबल पदावर यश संपादन केले आहे.



शेतकरी कुटुंबातील आर्थिक अडचणी, कमी उत्पन्न आणि नैसर्गिक संकटांचा सामना करत त्यांनी कठोर परिश्रम व आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश मिळवले.

भरतीच्या काही दिवस आधी पायाला दुखापत झाली असतानाही त्यांनी हार न मानता स्पर्धेत भाग घेतला. ग्राउंडमध्ये ३८ गुण आणि लेखी परीक्षेत ६७ गुण मिळवत त्यांनी पहिल्याच प्रयत्नात यश मिळवले.

अविनाश यांच्या या यशामुळे कुटुंब व गावाचे नाव उज्ज्वल झाले असून सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

## आई येडेश्वरीची चैत्र यात्रेनिमित्त वाहतुक मार्गात बदल



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२९ मार्च -**

धाराशिव जिल्ह्यातील येरमाळा येथे आई येडेश्वरी देवीची चैत्र पौर्णिमा यात्रा दि. २ ते ७ एप्रिल दरम्यान मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.

यात्रेनिमित्त लाखो भाविक राज्यासह इतर राज्यांतून येत असल्याने परिसरात मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे.

दि.२ एप्रिल रोजी छबिना तर ३ एप्रिल रोजी देवीची पालखी आमराईमध्ये येणार असून त्याच दिवशी चुनखडी वेचण्याचा मुख्य धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहे.

या पार्श्वभूमीवर वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी तसेच भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने महत्त्वाचे वाहतूक निर्बंध लागू केले आहेत.

जिल्हा प्रशासनाने नागरिकांनी व वाहनचालकांनी दिलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

### पर्यायी मार्ग व्यवस्था...

संभाजीनगर ते बार्शी : येरमाळा उड्डाणपूल-येडशी मार्गे.
बार्शी ते संभाजीनगर : कुसळंब-पांगरी-येडशी मार्गे.
कळंब ते बार्शी : मोहा फाटा-दहिफळ- येडशी-पांगरी-कुसळंब.
बार्शी ते परळी/परभणी : कुसळंब-पांगरी-येडशी-ढोकी-कळंब.
कळंब ते संभाजीनगर : कळंब-मनुष्यबळ फाटा-मांडवा-वाशी फाटा

### 'या' मार्गांवर वाहतुकीस मनाई...

येरमाळा-कुसळंब-बार्शी मार्गावर दोन्ही बाजूंनी वाहतुकीस बंदी.
बार्शी-कुसळंब- येरमाळा मार्गावर संभाजीनगरकडे येणारी वाहतूक बंद.
कळंब-येरमाळा-बार्शी मार्गावर वाहतूक बंद.
बार्शी-येरमाळा-परळी/परभणी मार्गावरील वाहतूक बंद.
कळंब- येरमाळा-संभाजीनगर मार्गावरही वाहतुकीस मनाई आहे.

### 'या' वाहनांना सूट...

पोलीस, रुग्णवाहिका, अग्निशमन दल, अत्यावश्यक सेवा, हलकी वाहने व एस.टी. बसेसना या निर्बंधातून सूट देण्यात आली आहे.



## सामान्य कार्यकर्त्याला संधी; निष्ठेचे फळ मिळाले : सिद्धेश्वर कोरे

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२९ मार्च -**

धाराशिव जिल्हा परिषदेच्या अर्थ व बांधकाम सभापतीपदी निवड झाल्यानंतर सिद्धेश्वर कोरे यांनी आपल्या यशामागे कार्यकर्त्यांची निष्ठा व पक्षावरील एकनिष्ठतेला कारणीभूत ठरल्याचे सांगितले. माध्यमांशी बोलताना त्यांनी ही भावना व्यक्त केली. नंदगावचे सरपंच, कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य, उपसभापती, पंचायत समिती सदस्य अशा विविध पदांवर काम करताना कार्यकर्त्यांना बळ देणे आणि त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे हेच आपले ध्येय राहिले. पक्षासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा अभिमान असल्याचेही त्यांनी सांगितले.



सभापतीपदाच्या शर्यतीत आपले नाव नसतानाही सामान्य कार्यकर्त्याला संधी दिली, याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले.

## विविध वृत्त...

### महाराष्ट्र राज्य महीला आयोगाच्या अध्यक्षपदी तृप्ती देसाई यांची नियुक्ती करण्याची मागणी



**तभा वृतसेवा**
**हाणेगाव, दि. २९ मार्च-**

महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय सामाजिक कार्यकर्त्या भुमाता ब्रीगेडच्या संस्थापीका सौ. तृप्तीताई देसाई यांना महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यासाठी भुमाता ब्रीगेडचे नेते मगदुम भाई शेख यांनी थेट मुख्यमंत्रीनां मेलद्वारे विनंती केली आहे.

तृप्ती देसाई यांनी महिला सक्षमीकरण आणि महीला हक्कासाठी सातत्याने कार्य करीत आहेत तसेच महिलांच्या न्याय हक्कासाठी अधिकारासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे त्यांच्या या कार्यामुळे आनेक महिलांना न्याय मिळाला असून समाजात सकारात्मक बदल घडुन आण्यासाठी त्यांचा मोलाचा वाटा आहे त्यांचा अणुभव ,नेत्रत्वगुन आणि समाजसेवेच्या भावनेमुळे त्या या पदासाठी योग्य उमेदवार ठरु शकतात कृपया या विनंतीचा सकारात्मक विचार करुन तृप्ती देसाई यांची महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करावी असे मगदुम भाई शेख यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महोदयांना मेलद्वारे विनंती केली आहे.

### पी.एम. श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देगलूर येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ मार्च-**

पी.एम.श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देगलूर येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमात परिसरातील मातांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून शिक्षिका मूळखेडे एस. व्ही यांनी उपस्थित मातांना महिला सक्षमीकरण, शिक्षणाचे महत्त्व आणि समाजातील महिलांची भूमिका याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारांनी उपस्थित महिलांना प्रेरणा मिळाली. कार्यक्रमात महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये उत्साहाने सहभागी झालेल्या विजेत्या मातांना संविधानाची प्रत भेट देऊन सन्मानित करण्यात आले, ही या कार्यक्रमाची विशेष आकर्षक बाब ठरली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. वंदना रवींद्र कांबळे होत्या. कार्यक्रमास सौ. अनिता गंगाधर मेनुरकर, सौ. पूजा संजय आरेवार, सौ. मेघा अमोल कोटगिरे, सौ. संगीता गंगाधर बारशेटवार, सुनिता बोगुलवार यांच्यासह कु. अश्विनी नामदेव आदींची उपस्थिती लाभली. तसेच शाळेतील शिक्षिका मुळखेडे एस. व्ही, अबसवार एस. एम., देशपांडे, एस. एस. यांनीही कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रवींद्र कांबळे, मुख्याध्यापक श्री मोतेवार पी. आर., कोठकर जी. एम. यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री चिद्रावार ए. बी. यांनी केले, तर आभार प्रदर्शन पाटील एस. एन. यांनी मानले.

एकूणच, महिलांच्या सन्मानाचा संदेश देणारा हा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

### योग्य दिशेने कठोर परिश्रम करा यश मिळेल : अतुल राजूरकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ मार्च-**

योग्य दिशेने कठोर परिश्रम केले तर स्पर्धा परीक्षेमध्ये यश मिळते असे प्रतिपादन आयपीएस अधिकारी अतुल राजूरकर यांनी केले डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे, अण्णाभाऊ साठे प्रशिक्षण संस्था (आर्टी) मुंबई आणि समृद्ध जीवन प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत पोलीस व सैन्य भरतीपूर्व प्रशिक्षण बॅच चे उद्घाटन दिनांक २० मार्च रोजी नांदेड येथे करण्यात आले यावेळी ते बोलत होते कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे आयपीएस अधिकारी अतुल राजूरकर, पोलीस निरीक्षक जगन पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार हिंगोले, पोलीस उप निरीक्षक सांगळे, पोलीस उप निरीक्षक जसपाल सिंग, इंज. प्रवीण खंदारे ,चंद्रमणी धुतराज, शुद्धोधन एडके यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आयपीएस अधिकारी राजूरकर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून त्यासाठी कठोर परिश्रम घेतले पाहिजे मी दोन वेळा यु पी एस सी परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालो आता तिसऱ्यांदा पास होणार आहे .विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून कठोर परिश्रम करायला हवे त्यामुळे यश आपल्याला मिळते असेही त्यांनी सांगितले. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार इंगोले यांनी सर्व विषयाचे योग्य नियोजन विद्यार्थ्यांनी करावे जेणेकरून स्पर्धा परीक्षेत आपण पास होऊ. तर पोलीस उप निरीक्षक जसपाल सिंग यांनी परिस्थितीची जाणीव ठेवून जिद्दीने अभ्यास करा असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंजि. प्रवीण खंदारे तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संचालक चंद्रमणी धुतराज यांनी केले या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## १५० दिवसीय ई - गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात नांदेड परिक्षेत्र अव्वल

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांचा सन्मान

नांदेड, दि.२८ मार्च:- मुख्यमंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्यात राबविण्यात आलेल्या १५० दिवसीय ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाच्या मुल्यमापनात नांदेड पोलीस परिक्षेत्र कार्यालयाने राज्यातील सर्व परिक्षेत्रांत प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

दिनांक २८ मार्च रोजी, मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे संपन्न झालेल्या बक्षीस वितरण समारंभात, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांना प्रशस्तिपत्र देऊन त्यांचा गौरव केला आहे. तत्पूर्वी, श्री उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रात केलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती आयोजित समारंभात दिली.

दिनांक ७ मे, २०२५ रोजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सर्व शासकीय कार्यालयांमध्ये कार्यालयीन सुधारणा घडवून आणण्यासाठी १५० दिवसीय ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम राबविण्याचे निर्देश दिले होते. सदर कार्यक्रमांतर्गत



प्रशासन अधिक लोकाभिमुख, गतिमान, पारदर्शक व तंत्रज्ञानाधारित व्हावे, या उद्देशाने विविध स्तरांवर व्यापक सुधारणा अपेक्षिल्या होत्या. यामध्ये संकेतस्थळ सुधारणा, आपले सरकार पोर्टल, ई-ऑफिस प्रणाली, डेटा डॅशबोर्ड, सोशल मीडिया एकत्रीकरण, व्हॉट्सपद्वारे सेवा वितरण तसेच नाविन्यपूर्ण वेब प्लिकेशन या विषयांवर विशेष भर देण्यात आला होता. त्यानुसार, पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रासाठी संकेतस्थळ नव्याने तयार करून ते अधिक सुरक्षित व नागरिकाभिमुख केले होते. संकेतस्थळावर विविध शासकीय योजना व सेवांचे केलेले एकत्रीकरण, आपले सरकार पोर्टल अंतर्गत तक्रारींची विहित वेळेतील सोडवणूक, ई-ऑफिस प्रणालीद्वारे कागदविरहित व जलद फाईल निपटारा, इंटरॅक्टिव्ह डॅशबोर्डद्वारे अचूक व अद्ययावत माहितीची उपलब्धता, याशिवाय, परिक्षेत्रातील अर्ज चौकशीच्या कामकाजासाठी सुरू केलेली 'संवेदना' ही ख आधारित संगणकीय कार्यप्रणाली, तक्रारदारांचे समाधान अजमावण्यासाठी दिलेली ऋशशवलरलज्ञ सुविधा, नांदेड परिक्षेत्रातातील गुन्हयांच्या तपासावर देखरेख ठेवण्यासाठी सुरू केलेली Eagle Eye ही प्रणाली व परिक्षेत्रातील गैरप्रकार व अवैध व्यवसायांच्या निर्मूलनासाठी सुरू केलेली हेल्पलाइन 'खबर' ( ९१ ५० १०० १००) या बाबी महत्त्वपूर्ण ठरल्या.

१५० दिवसांच्या सदर कार्यक्रमाची मुदत दिनांक १० जानेवारी, २०२६ रोजी पूर्ण झाल्यानंतर, परीक्षेत्रीय कार्यालयांनी केलेल्या कामगिरीचे मूल्यमापन प्रथमतः पोलीस महासंचालक कार्यालयाकडून करण्यात येऊन, त्यातून (४) परिक्षेत्रीय पोलीस महानिरीक्षक/उपमहानिरीक्षक कार्यालयांची निवड करण्यात आली होती. यात, नांदेड परिक्षेत्रीय कार्यालयाची देखील निवड करण्यात आली होती. त्यानंतर परिक्षेत्र कार्यालयांच्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद (Quality Council of India) यांनी केले होते. परिषदेने पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने केलेल्या उपरोक्त कामकाजाची दखल घेऊन परिक्षेत्रास प्रथम क्रमांक बहाल केला होता.

यापूर्वी, मुख्यमंत्री महोदयांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यात देखील नांदेड परिक्षेत्र कार्यालयाने राज्यात द्वितीय क्रमांक प्राप्त केला होता.

परिक्षेत्र कार्यालयातील पोलीस अधिकारी, अंमलदार व मंत्रालयीन कर्मचारी यांचेसोबतच ठूींहालूींशी कंपनीचे सॉफटवेअर इंजिनिअर हर्षानंद शर्मा, डएढ्ढीळलश कंपनीचे संचालक सारंग वाकोडीकर व सॉफटवेअर इंजिनिअर शहेबाज खान, पोलीस अंमलदार दिपक पवार यांनी अहोरात्र घेतलेल्या परिश्रमामुळेच हे यश शक्य झाले असून, या यशामध्ये नांदेड परिक्षेत्रातील प्रत्येक अधिकारी व अंमलदारांचा मोलाचा वाटा आहे, असे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी स्पष्ट केले आहे.

## २१ व्या आंबेडकरवादी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे तर ॲड. गोरक्ष लोखंडे यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ मार्च-**

येथील सत्यशोधक विचार मंच आणि नांदेड वाघाळा शहर मनपा कामगार- कर्मचारी युनियन (रौप्य महोत्सव वर्ष) यांच्या संयुक्त विद्यमाने फुले- शाहू- आंबेडकर- साठे- कर्डक प्रेरणेच्या २१ व्या आंबेडकरवादी साहित्य संमेलनाचे आयोजन दि. ९ मे २०२६ रोजी करण्यात आले असून आंबेडकरी चळवळीचं केंद्र असलेल्या नांदेडच्या क्रांतीभूमीत संपन्न होणाऱ्या सदरील संमेलनाच्या अध्यक्षपदी पुरोगामी विचारवंत, प्रख्यात लेखक, संपादक तथा महाराष्ट्राचे आघाडीचे पत्रकार संजय आवटे यांची निवड करण्यात आली असून संमेलनास खा. श्रीमंत शाहू छत्रपती, कोल्हापूर, खा.प्रा. रवींद्र चव्हाण, ज्येष्ठ नाटककार दत्ता भगत, दंगलकार नितीन चंदनशिवे, प्रा. रवीचंद्र हडसनकर, प्रा. जगदीश कदम, डॉ. विजय कदम आणि डॉ. जयवंतराव व्हटकर यासह अनेक दिग्गजांची उपस्थिती लाभणार आहे.

संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती- जमाती आयोगाचे सदस्य, प्रख्यात विचारवंत ॲड. गोरक्ष लोखंडे यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती संयोजक गणेश शिंगे, स्वागताध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, निमंत्रक जी.पी. मिसाळे, मुख्य समन्वयक ॲड. विजय गोणारकर, सहसंयोजक लालबाजी घाटे, संयोजन समितीचे अध्यक्ष उन्मेश ढवळे व कार्याध्यक्ष मारोती कदम यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी सत्यशोधक विचार मंचचे अध्यक्ष कोंडदेव हाटकर, सचिव श्रावण नरवाडे, उपाध्यक्ष राज गोडबोले, सल्लागार भीमराव हाटकर, प्रभू ढवळे, एन.टी. पंडीत, रमेश कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. महाड चवदार तळे सत्याग्रहाची शताब्दी आणि राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीच्या ऐतिहासिक पर्वावर होणाऱ्या या संमेलनात बी.आर. फाऊंडेशन नांदेड द्वारा भीमरत्न पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे. हा पुरस्कार दिवंगत आमदार नामदेवराव व्हटकर यांना जाहीर झाला आहे. नामदेवराव व्हटकर यांनी ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणाची चित्रफीत तयार केली असून हा अनमोल ठेवा त्यांनी युगानुयुगाकरीता दिला आहे. याकरीता त्यांनी आपले उदरनिर्वाहाचे साधन प्रिटींग प्रेस व राहते घर विकून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आगळी वेगळी आदरांजली अर्पण केली आहे. त्यांच्या निःस्वार्थ, निःस्पृह व अस्सीम निष्ठेला मानाचा मुजरा म्हणून समाजातून या पुरस्काराद्वारे कृतज्ञता व्यक्त करण्यात येणार आहे. हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी दिवंगत नामदेवराव व्हटकर यांचे चिरंजीव डॉ. जयवंतराव व्हटकर सहपरिवारासह उपस्थित राहणार आहेत. संमेलनात कवीसंमेलन, प्रकट मुलाखत, विविध पुरस्कारांचे वितरण, साहित्यकृतींचा गौरव, स्मरणिकेचे प्रकाशन आणि सांस्कृतिक जलसा अशा भरगच्च कार्यक्रमांची मांदियाळी असणार आहे. संमेलनाच्या यशस्वीतेसाठी डॉ. राम वनंजे, नागोराव डोंगरे, रणजीत गोणारकर, अनुरत्न वाघमारे, संजय जाधव, संतोष शिंगे, कुणाल दवणे, प्रसेनजीत अवताडे, शैलेश कांबळे, राजेश माने, संदीप पाईकराव, सुमीत सुर्यवंशी, अमोल कसबे, अशोक गायकवाड, राजेश वाकर्डे, सुमेध कंधारे, सचिन शिंगे, अंकीत पाईकराव, अरुण शिंगे, नितीन जोंधळे, आदर्श बोकन, बंटी गायकवाड, रमेश कसबे आदी परिश्रम घेत आहेत.

## राजवाडी येथील स्वस्त धान्य दुकानदारांचा मनमानी कारभार दिव्यांग बांधव व गावकऱ्यांची दुकानदारा विरुध्द तक्रार

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २९ मार्च-**

मौजे राजवाडी गावातील स्वस्त धान्य दुकानदार व्यवस्थित राशन गोरगरीब दिव्यांग बांधवांना वाटप नसल्याची तक्रार दिव्यांग बांधव व गावकऱ्यांनी केली आहे.

दिव्यांग व गोरगरीबांच्या ओ. टी.पी. घेऊन त्यांना राशन धान्य व्यवस्थित वाटप करत नाहीत व प्रत्येक वेळी लाभधारकांना २/३ किलो राशन कमी देतात राशन वाहतुक म्हणुन प्रत्येकाकडुन २० रूपये वसुल करतात व ब-याच अंत्योदाय कार्ड लाभाधारकांना व शेतकरी, शेतमजुरांना चालू महिन्याचा सुध्दा माल २/३ किलो प्रमाणे कमी दिला जात आहे व स्वस्त धान्य दुकानदार आपलीच मनमानी कारभार चालवतांना दिसत आहेत. यांना जर धान्य वाटप करायचे नसेल तर गावातील दुस-यांना कोटा द्यावे अन्यथा दर महिन्याचा कोटा व्यवस्थित वाटप करण्यासाठी सुचना करावेत. यापुढे अशी कोणतीही तक्रार गावक-यापर्यंत येउ नये अन्यथा तहसिल कार्यालय मुदखेड येथे उपोषणाचा इशारा दिव्यांग बांधवांच्या वतीने देण्यात आला आहे. १५ दिवसात कोटा वाटप करणा-यांचा निर्णय निकाली काढावे अशी दिव्यांग बांधवांच्या वतीने विनंती केली आहे.तसेच राजवाडी गावातील राशन वाटपाची व्यवस्था गावात असताना दुकानदारांच्या घरी १ कि.मी अंतरावर दिव्यांग बांधवाना तांडयावर माल घेण्यासाठी जावे लागत आहे. त्यामुळे त्रास कमी करावे. व तो पण लाभधारकांना उध्दट अपशब्द वापरत असतात. काही बायकांशी राशन घेण्यासाठी गेलेल्या महिलांना लाईकी व औकात म्हणुन हिनवत आहेत. अशा राशन दुकानदारांस कुठे तरी आळा बसायला पाहीजे अशी मागणी होत आहे.

शासन निर्णय कायद्या २०१६ नुसार कार्यवाही करावी अन्यथा वरिष्ठ पुरवठा अधिकारी यांच्याकडे तक्रार करण्यात यईल तक्रारदारांनी याअगोदरही तक्रार केली होती पण पुरवठा अधिकारी याकडे गांभीर्यान लक्ष दिले नसल्याने दिव्यांग बांधव व गावकरी रस्त्यावर उतरू व उपोषण किंवा आंदोलन करू असा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.

वरिष्ठ पुरवठा अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष ग्रामपंचायत कार्यालय राजवाडी येथे येऊन गावक-यांच्या समोर शाहनिशा किंवा सखोलपणे चौकशी करून दुकानदारावर कारवाई करावी. असे निवेदनात नमुद केले आहे.

## डिजीटल अरेस्टच्या नावाखाली मुंबईच्या तरुणीची फसवणुक; नांदेडच्या चार तरुणांना अटक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ मार्च-**

नांदेडच्या चार तरुणांनी थेट मुंबईतील एका तरुणीला आणि तिच्या कुटुंबीयांना दहशतवाद्यांशी संबंध असल्याचे सांगत डिजिटल अरेस्टच्या नावाखाली तब्बल ३२ लाखांना गंडविले आहे. हा प्रकार उघड होताच मुंबई पोलीसांच्या विशेष पथकाने नांदेडच्या त्या चार तरुणांना उचलले आहे. या प्रकरणामुळे आता नांदेडमधील गुन्हेगारी सायबर स्वरूपातही वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे. अटक केलेल्या तरुणांमध्ये तिघे इतवारा भागातील तर एकजण सिडकोतील आहे.

मुंबईतील गोरेगाव पूर्व येथे राहणाऱ्या एका २१ वर्षीय तरुणीला व्हाट्सअप व्हिडिओ कॉल करून चेन्नई पोलीस दलातील सब इन्स्पेक्टर अरुण कुमार बोलत असल्याचे सांगितले. मुंबई पोलिसांनी पहेलगाम हल्लयातील दहशतवादी अफजल खान याला अटक केली आहे. त्याच्याकडे तुमच्या आजीच्या नावाचे सिम कार्ड सापडले आहे. या सिम कार्डवरून देशाची गोपनीय माहिती शत्रू राष्ट्राला पुरविण्यात आली आहे, असे त्यांनी फोनवरून सांगितले. यादरम्यान घाबरलेल्या कुटुंबाचा विश्वास संपादन करण्यासाठी आरोपींनी हा कॉल मुंबई एटीएसच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना ट्रान्सफर केल्याचेही दर्शविले. या सर्व प्रकारादरम्यान त्यांनी पोलीस गणवेशही परिधान केला. त्यांच्यामागे दहशतवाद विरोधी पथक मुंबई असा फलकही लावण्यात आला होता. तुमचे दहशतवाद्यांशी संबंध असल्याचे सांगत या तरुणांनी त्या तरुणीला आणि त्यांच्या कुटुंबीयांना आरटीई नावाचे ॲप डाऊनलोड करण्यास भाग पाडले. त्यांना तीन ते चार दिवस घराबाहेरही पडू दिले नाही. ही डिजिटल अरेस्ट असल्याचे सांगत तपासणीच्या नावाखाली तुमची बँक खाते सुरक्षित आहेत की नाही हे तपासण्यासाठी खात्यातील पैसे आरबीआय प्रतिनिधीच्या खात्यावर पाठवावे लागतील आणि तपासणीनंतर ते परत केले जातील, असे खोटे आश्वासन देऊन आरोपींनी फिर्यादीकडून टप्प्याटप्प्याने ३२ लाख ६९ हजार ९९७ रुपये उकळले. आरोपींनी तरुणीला बनावट एफआयआर, अटक वॉरंट आणि इम्युनिटी सर्टिफिकेट देखील पाठवले होते. हा सर्व प्रकार फेब्रुवारी महिन्यात घडला होता.

सदर तरुणीचे वडील जर्मनीत होते जर्मनीतून परत येताच त्यांनी पोलिसांना सर्व प्रकार सांगितला. मुंबई पोलिसांनी केलेल्या सर्व तपासात तांत्रिक बाबी आधारे तरुणीची फसवणूक करणारे आरोपी हे नांदेडचे असल्याचे स्पष्ट झाले. त्यामध्ये निलेश प्रभाकर वासमवार वय २५, रा. साईनगर सिडको, शुभम संजय जोगदंड वय २५, रा. शक्तीनगर इतवारा नांदेड, अजय देविदास भोसले वय २५, रा. लोहार गल्ली इतवारा नांदेड आणि सिद्धांत दिलीप जोंधळे वय १९ रा. शक्तिनगर इतवारा या चौघांचा समावेश आहे. या चौघांनी इतरही अनेक सायबर गुन्ह्यांमध्ये सक्रिय सहभाग घेतला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या चौघांनाही मुंबई पोलीस दलाच्या विशेष पथकाने नांदेडमधून शनिवारी उचलले आहे. त्यांच्या अटकेची नोंद स्थानिक पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. त्यांना अटक करण्यासाठी नांदेड पोलीस दलाचीही मदत घेण्यात आल्याचे इतवारा विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांनी सांगितले.

## गॅस टंचाईवर मुक्रमाबादच्या तरुणाची मात; टाकाऊ 'वेस्ट ऑईल'वर चालणारी बनवली अनोखी शेगडी



**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि. २९ मार्च-**

सध्याच्या काळात घरगुती तसेच व्यावसायिक गॅस सिलिंडरचे दर गगनाला भिडले आहेत. युद्धामुळे व्यवसायिक गॅस पुरवठा बंद केल्याने हॉटेल व्यावसायिकांचे मोठे हाल होत आहेत . या समस्येवर मुक्रमाबाद येथील गजानन पांचाळ या इडली सेंटर हॉटेल मालकाने एक अनोखी शक्कल लढवली आहे. त्यांनी चक्क टाकाऊ 'वेस्ट काळ्या ऑईल'वर चालणारी शेगडी तयार केली असून, यामुळे गॅसवरील खर्चात मोठी बचत होत आहे.

गजानन पांचाळ यांनी स्वतःच्या कल्पकतेने ही विशेष शेगडी विकसित केली आहे. या शेगडीची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:

इंधनाचा खर्च नगण्य: ही शेगडी चालवण्यासाठी कोणत्याही गॅस किंवा लाकडाची गरज नाही. गॅरेजमध्ये टाकाऊ म्हणून फेकून दिले जाणारे 'वेस्ट इंजिन ऑईल' (काळे ऑईल) इंधन म्हणून वापरले जाते. वाऱ्याचा वापर: शेगडीला प्रखर ज्वाला मिळण्यासाठी एका छोट्या इलेक्ट्रिक ब्लोअरचा (पंख्याचा) वापर करण्यात आला आहे, जो नळीद्वारे हवा पुरवतो.

प्रचंड उष्णता: ऑईल आणि हवेच्या मिश्रणामुळे गॅसपेक्षाही जास्त प्रखर निळी आणि पिवळी ज्योत निर्माण होते, ज्यावर चहा, नाश्ता आणि जेवण अत्यंत कमी वेळात तयार होते.

**हॉटेल मालकाची मोठी बचत**

गजानन पांचाळ यांनी सांगितले की, दिवसेंदिवस वाढणाऱ्या गॅसच्या किमतीं व युद्धामुळे व्यावसायिक गॅस बंद झाल्याने हॉटेल चालवणे कठीण झाले आहे. अनेकदा सिलिंडर संपल्यावर कामाचा खोळंबा व्हायचा. त्यामुळे मी या पर्यायी शेगडीचा प्रयोग केला. आता टाकाऊ ऑईल स्वस्त दरात उपलब्ध होत असल्याने खर्चात जवळपास ७० ते ८० टक्के बचत होत आहे.

**परिसरात चर्चेचा विषय**

पांचाळ यांनी बनवलेली ही 'जुगाड' शेगडी पाहण्यासाठी मुक्रमाबाद परिसरात नागरिक गर्दी करत आहेत. ग्रामीण भागातील तरुणांनी जर अशा प्रकारे कल्पकता दाखवली, तर महागाईवर मात करणे सहज शक्य आहे, अशी चर्चा आता पंचक्रोशीत रंगत आहे. त्यांच्या या अनोख्या प्रयोगाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगोली**
**जाहिर प्रगटण**

प्रकरण :- गाळा हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनता रहिवाशी मोहल्ला सर्व्हे नं. ७६ नवा मोंढा, हिंगोली यांना कळविण्यात येते की, **श्री. प्रकाशचंद्र गोर्वधनदास सोमाणी,** रा. हिंगोली ता. जि. हिंगोली यांनी नगर परिषद हिंगोली च्या हद्दीतील मोहल्ला नवा मोंढा येथील सर्व्हे नं. ७६, सिट नं ९८ सिटी सर्व्हे नं ४०६१ मध्ये असलेल्या व मंजूर लेआऊट नकाशाप्रमाणे तळमजल्या वरील गाळा क्रं. १८ ज्याची लांबी : दक्षिण-उत्तर २० फुट म्हणजेच ६.१० मीटर व रुंदी पुर्व-पश्चिम १२ फुट म्हणजेच ३.६५ मीटर म्हणजेच २२.२६ चौ. मिटर ज्याचे एकुण क्षेत्रफळ २४० चौ. फुट ज्याची चतु:सिमा पुर्वेस: गाळा क्रं १७, पश्चिमेस गाळा क्रं १९, दक्षिणेस बाजार समितीचा ओटा, उत्तरेस : बाजार समितीचा रस्ता वरील चर्तु-सिमेच्या आतील गाळा क्रं. १८ हा **श्री. प्रकाशचंद्र गोर्वधनदास सोमाणी** रा. हिंगोली ता. जि. हिंगोली यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली कडून भाडेपट्टा करारातील राहीलेल्या उर्वरीत (२८/०६/२०२६) पर्यंतच्या कालावधी करीता नोंदणीकृत भाडेपट्टा लेख दि. २८/०६/१९९६ अन्वये भाडयाने घेतला होता त्यांना सदरील गाळयाची आवश्यकता नसल्यामुळे सदरील गाळा ते श्री शैलेश बालाप्रसाद तापडिया, रा. हिंगोली यांना राहीलेल्या उर्वरीत (२८/०६/२०२६) पर्यंतच्या कालावधी करीता कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली मार्फत **श्री. शैलेश बालाप्रसाद तापडिया,** रा. हिंगोली यांची कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली च्या रेकॉर्डला उपरोक्त भाडेकरु म्हणून हस्तांतरणाची नोंद करुन घेण्यासाठी विनंती अर्ज केलेला आहे.

सदरील हस्तांतरणाबाबत कोणास काही आक्षेप व उजर असल्यास त्यांनी सदरील नोटीस जाहिर प्रगटन मध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसात कार्यालयात लेखी उजर कार्यालयाच्या पत्यावर अथवा प्रत्यक्ष दाखल करावेत. १५ दिवसात उजर आक्षेप न दाखल केल्यास १५ दिवसानंतर कोणासही वरील हस्तांतरणाबाबत आक्षेप व उजर नाही असे गृहित धरुन त्यांच्या नावाने हस्तांतरण नियमाप्रमाणे करुन देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सचिव** **प्रशासक**
**कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगोली**

**कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगोली**
**जाहिर प्रगटण**

प्रकरण :- गाळा हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनता रहिवाशी मोहल्ला सर्व्हे नं. ७६ नवा मोंढा, हिंगोली यांना कळविण्यात येते की, **श्री. श्रीकिशन चंद्रप्रकाश सोमाणी,** रा. हिंगोली ता. जि. हिंगोली यांनी नगर परिषद हिंगोली च्या हद्दीतील मोहल्ला नवा मोंढा येथील सव्हे नं. ७६. सिट नं ९८ सिटी सर्व्हे नं ४०६१ मध्ये असलेल्या व मंजूर लेआऊट नकाशाप्रमाणे तळमजल्यावरील गाळा क्र. १७ ज्याची लांबी : दक्षिण-उत्तर २० फुट म्हणजेच ६.१० मीटर व रुंदी पुर्व-पश्चिम १२ फुट म्हणजेच ३.६५ मीटर म्हणजेच २२.२६ चौ. मिटर ज्याचे एकुण क्षेत्रफळ २४० चौ. फुट ज्याची चतुः सिमा पुर्वेस: बाजार समितीची मोकळी जागा, पश्र्चिमेस गाळा क्रं १८, दक्षिणेस बाजार समितीचा ओटा, उत्तरेस बाजार समितीचा रस्ता वरील चर्तु-सिमेच्या आतील गाळा क्र. १७ हा **श्री. श्रीकिशन चंद्रप्रकाश सोमाणी** रा. हिंगोली ता. जि. हिंगोली यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली कडून भाडेपट्टा करारातील राहीलेल्या उर्वरीत (२८/०६/२०२६) पर्यंतच्या कालावधी करीता नोंदणीकृत भाडेपट्टा लेख दि. २८/०६/१९९६ अन्वये भाडयाने घेतला होता त्यांना सदरील गाळयाची आवश्यकता नसल्यामुळे सदरील गाळा ते **श्री विष्णु मदनलाल मुंदडा,** रा. हिंगोली यांना राहीलेल्या उर्वरीत (२८/०६/२०२६) पर्यंतच्या कालावधी करीता कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली मार्फत **श्री विष्णु मदनलाल मुंदडा,** रा. हिंगोली यांची कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली च्या रेकॉर्डला उपरोक्त भाडेकरु म्हणून हस्तांतरणाची नोंद करुन घेण्यासाठी विनंती अर्ज केलेला आहे.

सदरील हस्तांतरणाबाबत कोणास काही आक्षेप व उजर असल्यास त्यांनी सदरील नोटीस जाहिर प्रगटन मध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसात कार्यालयात लेखी उजर कार्यालयाच्या पत्यावर अथवा प्रत्यक्ष दाखल करावेत. १५ दिवसात उजर आक्षेप न दाखल केल्यास १५ दिवसानंतर कोणासही वरील हस्तांतरणाबाबत आक्षेप व उजर नाही असे गृहित धरुन त्यांच्या नावाने हस्तांतरण नियमाप्रमाणे करुन देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सचिव** **प्रशासक**
**कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगोली**

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तरुणांनी शिक्षणाला कौशल्यात रूपांतरित करावे : आदिनाथ सांगवे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च :** तरुणांनी केवळ पदव्या न मिळवता आपल्या शिक्षणाला कौशल्यात रूपांतर करून जीवन समृद्ध करावे असे प्रतिपादन महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ उद्योजक आदिनाथ सांगवे यांनी केले. महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय, लातूर आणि मलाबार चॅरिटेबल ट्रस्टद्वारे आयोजित शिष्यवृत्ती आणि प्रमाणपत्र वितरण समारंभात अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी विचारमंचावर महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे, प्रभारी प्राचार्य प्रो.डॉ.आनंद शेवाळे, पर्यवेक्षक प्रा.नितीन वाणी, जनशिक्षण संस्थेच्या संचालिका सोनी दायमा, मलाबार शाखा लातूरचे व्यवस्थापक तानाजी जगताप, जिजामाता महाविद्यालयाचे प्राचार्य देविदास कोल्हे आणि बाबासाहेब सोन-वणे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्र्वर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून दिप प्रज्वलन करण्यात आले. पुढे बोलताना आदिनाथ सांगवे म्हणाले की, शिक्षणाचे सार्वत्रिकरण झाले असले तरी सर्वसामान्यांना उच्च शिक्षण परवडणारे नाही. अनेक सामाजिक संघटना वंचित, उपेक्षित, गरजू, होतकरू विद्यार्थ्यांकरिता मदतीचा हात देत आहेत.



## विविध वृत्त...

### प्रभावी संवाद कौशल्य, वक्तृत्व नेतृत्व विकासाची भक्कम पायाभरणी

**लातूर :** भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जिल्हास्तरीय युवक-युवती नेतृत्व विकास शिबीर' उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या शिबिरात ''प्रभावी संवाद कौशल्य आणि वक्तृत्व कला'' या विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख वक्ते डॉ. ज्ञानदेव राऊत (मराठी विभाग, शहीद भगतसिंग महाविद्यालय, किल्लारी) यांनी आपल्या विस्तृत मार्गदर्शनात सांगितले की, ''संवाद हा केवळ माहिती देण्याचा मार्ग नसून तो व्यक्तिमत्त्व घडवण्याचा मूलभूत पाया आहे. प्रभावी संवादासाठी विचारांची स्पष्टता, भाषेवर प्रभुत्व, आत्मविश्वास आणि श्रोत्यांशी संवाद साधण्याची क्षमता अत्यंत महत्त्वाची आहे. युवकांनी वाचन, चिंतन आणि सतत सराव यांच्या माध्यमातून वक्तृत्व कौशल्य विकसित केले पाहिजे. आजच्या डिजिटल युगातही प्रत्यक्ष संवादाची ताकद कमी झालेली नाही; उलट योग्य संवादकौशल्य असलेला युवक समाजात नेतृत्वाची भूमिका प्रभावीपणे पार पाडू शकतो.''ते पुढे म्हणाले, ''वक्तृत्व ही केवळ भाषण देण्याची कला नसून ती लोकांना प्रेरित करण्याची आणि योग्य दिशादर्शन करण्याची शक्ती आहे. नेतृत्व विकसित करण्यासाठी संवादातील प्रामाणिकपणा, संयम आणि सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक आहे.'' कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना डॉ. जयद्रथ जाधव (मराठी विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, रेणापूर) म्हणाले की, ''आजच्या स्पर्धात्मक आणि वेगवान युगात युवकांनी केवळ शैक्षणिक ज्ञानावर समाधान मानू नये, तर ते प्रभावीपणे मांडण्याची कला आत्मसात करणे गरजेचे आहे. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव आलगुले, डॉ. प्रमोद चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.या शिबिराच्या माध्यमातून युवक-युवतींमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास, प्रभावी संवाद कौशल्य आणि वक्तृत्व कला विकसित होण्यास मोठी चालना मिळत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

### 'प्रकल्प, क्षेत्रीय संकलन व शिक्षणांतर्गत सेवा' विषयावर कार्यशाळा संपन्न !

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद कला महाविद्यालयातील मराठी विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रकल्प, क्षेत्रीय संकलन व शिक्षणांतर्गत सेवा' या विषयावर विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत प्रमुख साधन व्यक्ती म्हणून डॉ. ब्रिजमोहन दायमा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता व्यावहारिक अनुभवातून शिकावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या 'प्रकल्प, क्षेत्रीय संकलन व शिक्षणांतर्गत सेवा' या विषयावरील विशेष व्याख्यान आणि कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या प्रसंगी प्रमुख साधन व्यक्ती म्हणून डॉ. ब्रिजमोहन दायमा यांनी व्यवहारातील विविध उदाहरणे देत विद्यार्थ्यांना या विषयाचे महत्त्व पटवून दिले.क्षेत्रीय प्रकल्प करताना पुस्तकांतील ज्ञानालाव्यावहारिक ज्ञानाची जोड आवश्यक असते असे मत प्रतिपादन केले.आपल्या मार्गदर्शनात डॉ. दायमा म्हणाले की, कोणत्याही प्रकल्पाचे यश हे त्याच्या सूक्ष्म नियोजनावर आणि क्षेत्रीय संकलनावर अवलंबून असते. केवळ माहिती गोळा करणे म्हणजे संकलन नव्हे, तर त्या माहितीचे विश्र्लेषण करून त्यातून निष्कर्ष काढणे महत्त्वाचे आहे. दैनंदिन व्यवहारातील सोपी उदाहरणे देत त्यांनी प्रकल्पाची मांडणी कशी करावी, यावर सविस्तर प्रकाश टाकला.

### सक्शन मशीनचे आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते लोकार्पण

**लातूर :**स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत रेणापूर नगरपंचायतीला राज्य शासनाकडून मिळालेल्या सक्शन मशीनचा भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते शुक्रवारी लोकार्पण करण्यात आले.राज्य शासनाच्या वतीने स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत मागील काळात बांधकाम केलेल्या घरासह विविध इमारतीतील दुरावस्था झालेल्या अथवा भरलेल्या शौचालय टँकचा उपसा करण्यासाठी रेणापूर नगरपंचायतीला तब्बल १८ लाखाची सक्शन मशीन नुकतीच प्राप्त झाली आहे. सदर सक्शन मशीनचे भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा श्रीमती शोभाताई शामराव आकनगिरे, पंचायत समितीच्या सभापती सौ. मोनिका सूर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर, नगरपंचायत पाणीपुरवठा सभापती दत्ता सरवदे, स्वच्छता निरीक्षक मेहमूद शेख, मारूफ आत्तार, ईश्वर बद्दर, हनुमंत भालेराव, योगेश राठोड, रमेश चव्हाण, मनोज चक्रे, परमेश्वर मोटेगावकर, सोपान सातपुते, शेख शौकत यांच्यासह अनेक जण होते.

### बस पास हरवला आहे

कार्तिक शंकर धावारे या लातूरच्या साने गुरुजी विद्यालयात इयत्ता नववी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्याचा एसटी बस सवलत पास मुरुड अकोला - लातूर बस प्रव-ासात हरवला आहे. कोणाला सापडल्यास कृपया पुढील मोबाईलवर संपर्क साधावा.

**संपर्क : ७७७५० २११०१**

## संघ शताब्दी वर्षात पंचपरिवर्तनाचा संकल्प

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च :** राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या कार्याला शंभर वर्ष पुर्ण झाले. या शंभर वर्षाच्या काळात संघाने सर्व समाजघटका पर्यंत जाण्याचा ,समाज संघटीत करण्याचा प्रयत्न केला असुन, अनेक गोष्टी झाल्या कांही राहील्या त्या पुर्ण करण्यासाठी संघाने समाजाच्या संवादासाठी संपर्कासाठी पंच परिवर्तनाचे सुत्र समाजा समोर ठेवले असुन त्या निमित्ताने गाव वस्ती पातळीपर्यंत हिंदु संमेलने होत असल्याची माहिती रा.स्वं सेवक संघाच्या पश्चीम क्षेत्र (महाराष्ट्र गोवा गुजराथ) प्रचार प्रमुख प्रमोदजी बापट यांनी लातूरात पत्रकारांच्या संवाद बैठकीत बोलताना दिली.यावेळी जिल्हा प्रचार प्रमुख सीए जगदीश तोष्णीवाल यांनी प्रास्ताविक केल. यावेळी लातूर विभागसंघचालक सीए संजय अग्रवाल,शहरसंघचालक उमाकांत मद्रेवार यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना प्रमोदजी बापट म्हणाले की, संघाच्या कामात मोठ्या संख्येने तरुण जोडला जात आहे वेब साईटच्या माध्ममातुन महिन्याला सरासरी पस्तीस हजार इतके लोक जोडले जात आहेत. संघाला स्वतःच्या संघटन शक्ती पेक्षा समाज संघटन हे महत्वाचे असल्यामुळे संघाने विविध उपक्रमाच्या माध्यमातुन समाजाशी नाते जोडण्याचा प्रयत्न केला आहे त्याला समाजातील सज्जन शक्ती मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत आहे. देशभरात संघाच्या ८८ हजार शाखा असुन महाराष्ट्रात सहा हजार शाखा आहेत तसेच साप्ताहिक मिलन आणि मासिक मिलनाच्या माध्यमातुन संघकाम होत आहे. संघाच्या संघटन आणि सेवेची १०० वर्ष हे व्यापक गृहसंपर्क अभियानाच्या माध्यमातुन भारतभर घरोघरी माहिती दिली जात आहे. समाजातील प्रमुख नागरिकांच्या एकत्रीकरणातुन संगोष्ठी सारखे कार्यक्रमाचे आयोजन केल जात आहे त्याला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. समाजातील विविध वर्ग आणि संघटन यांच्या सोबत सद्भावना बैठकाचे आयोजन केले जात आहे. व्यापक प्रमाणावर समाज संघटील व्हावा म्हणुन गाव, प्रभाग पातळीवर हिंदु संमेलनाचे आयोजन होत असुन समाज प्रबोधन केले जात आहे. संघाच मुख्य काम व्यक्ती निर्माणाचे आहे असे सांगुन या शताब्दी वर्षात पंचपरिवर्तनाचे सुत्र मांडले आहे. या पंचपरिवर्तना मध्ये सामाजिक समरसता, पर्यावरण संरक्षण,



कुटुंब प्रबोधन, स्व आधारित जिवन, नागरिक कर्तव्य याचे समाजाने स्वतः च्या जिवनात अचरण करावे यासाठी जनप्रबोधन केले जात आहे.

## माईर एमआयटी लातूर येथे 'विश्वमैदान २०२६' आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेचा आज भव्य शुभारंभ

### पाच दिवसीय क्रीडा महोत्सवात अंतिम सामने रंगणार; प्रा. तेजस कराड यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च :** माईर एमआयटी शिक्षण संस्था समूह, लातूर यांच्या वतीने 'विश्वमैदान २०२६' या आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे भव्य आयोजन करण्यात आले असून, हा पाच दिवसीय क्रीडा महोत्सव ३० मार्च ते ३ एप्रिल २०२६ या कालावधीत रंगणार आहे.





प्रा. तेजस कराड

या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ सोमवार, दि. ३० मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता माईर एमआयटी शिक्षण संकुलातील विश्वधर्मी विश्व मैदान क्रीडांगणावर पार पडणार आहे. उद्घाटनासाठी महाराष्ट्र विधान परिषदेचे आमदार विक्रम काळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी सन्माननीय पाहुण्या म्हणून लातूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच क्रीडा व युवक सेवा विभागाचे उप संचालक महादेव कसगावडे, माजी रणजी क्रिकेटपटू विशाल गिते, आंतर राष्ट्रीय नेमबाज जागृती चंदनकेरे-बोपचंडे, आंतर राष्ट्रीय बेसबॉल खेळाडू ज्योती पवार यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

समारोप सोहळा शुक्रवार, दि. ३ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता होणार असून, लातूर लोकसभेचे खासदार डॉ. शिवाजी काळगे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी लातूर भाजपचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील मुरूमकर, लातूर मनपा नगरसेविका प्रेरणा होनराव आणि मनपा उपायुक्त वसुधा फड उपस्थित राहणार आहेत. तसेच कर्करोग तज्ञ डॉ. ब्रिजमोहन झंवर व भूलतज्ञ डॉ. आरती झंवर सहभागी खेळाडूंना मार्गदर्शन करणार आहेत. या क्रीडा महोत्सवा मागे माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे संस्थापक डॉ. विश्वनाथ दा. कराड यांची प्रेरणादायी संकल्पना असून, कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

''एकच आव्हान, जिंकूया मैदान!'' या घोषवाक्याखाली होत असलेल्या या स्पर्धांचा उद्देश युवकांमध्ये क्रीडावृत्ती, नेतृत्वगुण, शिस्त आणि संघभावना विकसित करणे हा आहे. ''वसुधैव कुटुंबकम्'' या तत्त्वावर आधारित हा महोत्सव बंधुभाव, एकात्मता आणि जागतिक शांततेचा संदेश देणार आहे.

या स्पर्धेअंतर्गत २२ ते २९ मार्च दरम्यान इनडोअर व आउटडोअर प्रकारातील लीग व नॉकआउट सामने पार पडले असून, विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील ७५३ खेळाडूंनी सहभाग घेतला. उपांत्य फेरीतील विजेत्यांनी अंतिम फेरीत प्रवेश मिळवला असून, ३० मार्च ते ३ एप्रिल दरम्यान विविध क्रीडा प्रकारांचे अंतिम सामने रंगणार आहेत, अशी माहिती संचालक प्रा. तेजस हनुमंत कराड यांनी दिली.

## मतदार यादी विशेष सघन पुनरावलोकन (SIR) मोहिमेत लातूर तालुक्यातील मतदारांनी सहकार्य करण्याचे आवाहन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च :** भारत निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा प्रशासनामार्फत मतदार यादीचे विशेष सघन पुनरावलोकन (SIR) कार्यक्रम लवकरच राबविण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत मतदार यादीतील अस्पष्ट फोटो, दुबार नावे आणि 'एसआयआर मॅपिंग' (SIR Mapping) यांसारखी महत्त्वाची कामे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्यामार्फत वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश प्राप्त झाले आहेत.

या पार्श्र्वभूमीवर लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पंचायत समिती सभागृह येथे शहरातील सर्व नगरसेवक, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आणि बीएलओ पर्यवेक्षकांची आढावा बैठक झाली. या बैठकीत उपस्थितांना एसआयआर कार्यक्रम, मॅपिंग आणि मतदारांमधील जनजागृतीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

सध्या लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे मॅपिंगचे केवळ ५१टक्के कामकाज पूर्ण झाले असून, हे काम ३१ मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करणे अनिवार्य आहे. बीएलओ घरोघरी भेट देऊन माहिती संकलित करत असताना अनेक मतदार सहकार्य करत नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून, माहिती उपलब्ध करून न दिल्यास संबंधित मतदारांना सुनावणीसाठी बोलावले जाईल. ज्या मतदारांचे मॅपिंग पूर्ण झालेले नाही, त्यांना बीएलओमार्फत २ ते ३ वेळा सुनावणीची नोटीस दिली जाईल आणि सुनावणीस उपस्थित राहून पुरावे सादर केल्यास त्यांचे नाव मतदार यादीत कायम ठेवले जाईल. मात्र, सुनावणीसाठी अनुपस्थित राहिल्यास किंवा पुरावे सादर न केल्यास मतदाराचे नाव मतदार यादीतून थेट वगळले जाईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

२३४-लातूर ग्रामीण व २३५-लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदारांनी आपापल्या रहिवास क्षेत्रातील बीएलओ यांची समक्ष भेट घेऊन त्यांना आवश्यक माहिती उपलब्ध करून द्यावी. मतदारांनी स्वतःचा किंवा कुटुंबातील सदस्यांचा २००२ च्या मतदार यादीतील तपशील अधिकृत संकेतस्थळावर किंवा 'ECINET' पवर शोधून बीएलओना सहकार्य करावे, तसेच विवाहित महिलांनी त्यांच्या माहेरच्या नातेवाईकांची २००२ च्या यादीतील माहिती उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे व तहसीलदार सौदागर तांदळे यांनी यावेळी केले. या बैठकीस मनपा उपायुक्त पंजाब खानसोळे, नायब तहसीलदार अर्चना मैंदर्गी यांच्यासह बीएलओ, पर्यवेक्षक उपस्थित होते.

## माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सूचनेनंतर प्रशासकीय हालचाली, उपोषणाची सांगता

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च :** लातूर जिल्ह्यातील मौजे साई येथे फोफावलेली अवैध दारु विक्री आणि त्यामुळे ढासळलेली कायदा-सुव्यवस्था सुधारण्यासाठी तरुण कार्यकर्ते श्री. सुरज दत्तात्रय पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौक, लातूर येथे २५ मार्चपासून सुरू केलेले उपोषण, प्रशासनाच्या आश्वासनानंतर २६ मार्च रोजी रात्री ८ वाजता मागे घेण्यात आले आहे.

साई गावात राजरोसपणे सुरू असलेल्या अवैध दारु विक्रीमुळे मद्यपींचा त्रास वाढला असून, महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर झाला आहे. या अवैध धंद्यांवर कायमस्वरूपी बंदी घालावी आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, या प्रमुख मागण्यांसाठी श्री. सुरज पाटील उपोषण सुरू केले होते.

या उपोषणाची माहिती मिळताच राज्याचे माजी मंत्री तथा काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी तातडीने दखल घेण्याच्या सूचना दिल्या. त्यांच्या सूचनेनुसार काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्री. अभय साळुंखे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. संतोष देशमुख, श्री. राजकुमार

पाटील आणि पंचायत समिती सभापती श्रीकांत बैले यांनी उपोषणस्थळी भेट देऊन उपोषणकर्त्यांशी संवाद साधून, मागण्या जाणून घेतल्या. यानंतर याप्रश्नी जिल्हा प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी यावेळी लोकप्रतिनिधींनी केली.

दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर आणि संबंधित

विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत, अवैध व्यवसायांवर कडक कारवाई करण्याचे आश्वासन देण्यात आले. त्यानंतर श्री. सुरज दत्तात्रय पाटील यांनी आपले उपोषण सोडले.

यावेळी साई गावचे उपसरपंच अमोल पवार, बापूराव पवार, परमेश्वर पवार यांच्यासह मोठ्या संख्येने गावकरी आणि महिला उपस्थित होत्या. गावकरी आणि महिलांच्या आक्रमक पवित्र्यामुळे प्रशासनाला आता या अवैध धंद्यांविरुद्ध ठोस पावले उचलावी लागणार आहेत.

## भाजपा मुरुड मंडल नूतन पदाधिकाऱ्यांना आ. कराड यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च :** भारतीय जनता पार्टी मुरुड मंडलातील नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले. मुरुड शहराध्यक्ष पदाची जबाबदारी महेश कणसे यांच्यावर देण्यात आली असून सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

भारतीय जनता पार्टी मुरुड मंडल अध्यक्ष सुरज शिंदे यांनी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली ६१ जणांची कार्यकारिणी केली असून या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना रविवारी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वितरण करण्यात आले यावेळी भाजपाचे मंडलाध्यक्ष सुरज शिंदे, बन्सीभाऊ भिसे, प्रताप पाटील, साहेबराव मुळे यांच्यासह इतर अनेकांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मुरुड मंडळ सरचिटणीस विश्र्वास कावळे, ॲड. धनराज शिंदे, उपाध्यक्ष राजाभाऊ वैद्य, दत्ता सप्ताळ, बालाजी नाईकवाडे, वैजनाथ हर-ळे, रमेश शिंदे, रमाकांत गायकवाड, चिटणीस - गोविंद मुंडे, दीपक मगर, किशोर घुटे, सुखदेव बर्डे, लहूराजे सव्वाशे, श्रीकांत झाडके, बाळासा-हेब देशमुख, कोषाध्यक्ष प्रशांत साखरे यांच्यासह कार्यकारणीतील सदस्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

मुरुड शहराध्यक्ष महेश कणसे, मुरुड मंडळ युवा मोर्चा अध्यक्ष किरण मुंडे, सरचिटणीस आकाश करदुरे, महिला मोर्चा अध्यक्ष जनाबाई साखरे, एससी मोर्चा अध्यक्ष श्रीराम आदमाने, सरचिटणीस गौतम राऊत, ओबीसी मोर्चा अध्यक्ष किशोर सुडके, अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्ष अल्ताफ तांबोळी, सोशल मीडिया अध्यक्ष बालाजी गवळी, संयोजक विशाल मगर, किसान मोर्चा अध्यक्ष संजय सूर्यवंशी यांनाही आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले.





सर्व नवनिर्वाचीत पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी पक्ष संघटना मजबूत करण्याबरोबरच केंद्र आणि राज्य शासनाच्या योजना सर्वसामान्य गरजू आणि पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचवाव्यात असे बोलून दाखवले. यावेळी भाजपाचे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी सुरज शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.